ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मे २००९ ● मूल्य १० रुपये

## समृद्धीचे ढग जमत आहेत!







## ‘वारस होऊ अभिमन्यूचे’ पुस्तकाचे प्रकाशन




प्रकाशन समयी – लेखिका अनुराधा गोरे, कर्नल बालाजी आणि डॉ. स्नेहलता देशमुख



लेफ्टनंट कर्नल मनीष कदम याचे वडील शशिकांत कदम विचार मांडताना

## ग्रंथालीचे ताजे प्रकाशन




### नियतीशी करार

**संदीप जावळे**

स्वत:शी सुसंगत होऊ पाहणाऱ्या आणि समाजात सर्वांगीण बदल करू इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसाने वाचावे असे हे लेखन! मानवी धारणांत अंतर्बाह्य परिवर्तन घडून यावे आणि त्यातून समाजाचे सांस्कृतिक उत्थान व्हावे यासाठी ओघवत्या शैलीत केलेले हे परखड प्रतिपादन!

मूळ किंमत ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**जून २००९**
**वर्ष २९ वे, अंक ६ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी :संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**
पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


स. न.

निवडणुकीसंबंधीचे तथाकथित अभ्यासकांचे अनेक अंदाज सपशेल खोटे पाडत केंद्रात डॉ.मनमोहन सिंग यांचे सरकार पुन्हा स्थानापन्न झाले. त्यानंतर राजकीय भाष्यकारांना गेल्या पाच वर्षांतील सरकारचे गुण आणि विरोधकांचे दोष नव्याने लक्षात आले. पण वीसएक जागा जर इकडच्या तिकडे झाल्या असत्या तर गुणदोषांचा हाच युक्तिवाद परस्परविरुद्ध झाला असता. समाजमन एवढे सूक्ष्म आणि गुंतागुंतीचे की त्याचा ठाव घेणे कर्मकठीण. एकाच वेळी अनेक छेद देणाऱ्या घटना घडत असतात. तरीही समाजातील सुप्त लाटांचा ठाव घेण्याची प्रक्रिया अखंड चालू असते.

जवळपास हेच जागतिक पातळीवर आलेल्या आर्थिक अरिष्टाबाबत घडत आहे. त्याचा ठाव घेण्याच्या कामी देशोदेशीचे अर्थतज्ज्ञ लागले आहेत, जेणेकरून त्यावर लवकर उपाय शोधता येईल. अनेक मातबर विद्यापीठांत शिकलेली आणि विविध वित्तीय संस्थांत उच्चपदांवर असलेली ही मंडळी आहेत. काही तर नोबेल पारितोषिक विजेती आहेत. सर्व प्रकारची माहितीतंत्रज्ञानातील साधने त्यांच्या हाताशी आहेत. दुर्दैवाने, एवढे असूनही येणाऱ्या आर्थिक आरिष्टाची पुसटशी कल्पनाही त्यांना येऊ शकली नाही. किंबहुना जाणते अजाणतेपणी तेही या अरिष्टाला कारणीभूत ठरले! आणि दैवदुर्विलास असा की हे सगळे कसे टाळले गेले असते हेही त्यांच्याकडूनच ऐकावे लागते आहे.

ते काहीही असो, पण अंदाज बांधण्याची आणि नंतर ते पडताळून पाहण्याची सवय मनुष्यात उपजतच असते. तेच त्याचे वेगळेपण आहे. त्यासाठी लागते कुतूहल, जिज्ञासा आणि ज्ञानलालसा. याचा आग्रह ग्रंथाली आपल्यापरीने सतत धरत असते.

**– संपादक**

## अनुक्रम


- **डॉ. द.भि. कुलकर्णी** / २
- **प्रा. मिलिंद जोशी** / ४
- **प्रा. वि.ह. क्षीरसागर** / ८
- **डॉ. विजय जोशी** / ११
- **शुभानन गांगल** / १७
- **उन्मेश झगडे** / १८
- **विनायक गोखले** / २०
- **जनसंवाद वृत्तांत** / २१

# सामान्य सामान्यच राहिले म्हणून...

– डॉ. द.भि. कुलकर्णी

**सामान्य माणसाची शक्ती फार मोठी आहे पण; दुर्देवानं त्याची जाणीव सामान्य माणसालाच नाही. भाषिक राज्यांनी सामान्य माणसाचा आत्मविश्वास वृद्धिंगत केला पाहिजे. आपण नेहमी सामाजिक दुराचाराबद्दल बोलतो. भ्रष्टाचार, जातीयता, अकर्मण्यता इत्यादी. मला नेहमी असं वाटतं की, सामान्य माणसाच्या इतर शक्ती कमी आहेत, असं आपण समजतो. हे खरं नाही, पण अनाचार करण्याची सामान्य माणसाची शक्ती कमी आहे, हे मात्र लक्षात ठेवलं पाहिजे. सामान्य माणूस हा अल्पसंतुष्ट आहे त्यामुळे तो मोठे घोटाळे करत नाही. मोठे घोटाळे करणारी माणसं मोठीच असतात. या तथाकथित मोठ्या माणसांपेक्षा तो नि:स्वार्थी आहे. फक्त त्याला आपल्या शक्तीची जाणीव नाही. ती जाणीव त्याला कोणी करून दिली तर हा सामान्य माणूस या समाजाला दूरवर प्रगतिपथावर घेऊन जाऊ शकतो.**

१ मे, १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. गुजरात आणि महाराष्ट्र यांचं जे व्दिभाषिक होतं ते मोडून हा नवीन महाराष्ट्र अस्तित्वात आलेला आहे. एक-भाषिक राज्य का आवश्यक असतं तर त्या प्रदेशातल्या सामान्य माणसाची जी मातृभाषा आहे त्या मातृभाषेतून सर्व प्रशासकीय, शैक्षणिक व्यवहार होणं गरजेचं आहे. कारण लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग सगळ्यात महत्त्वाचा असतो. लोकांच्या भाषेत शैक्षणिक, शासकीय व्यवहार झाला नाही तर राज्यकर्ते, शासनकर्ते, विद्वान काय करताहेत हे सामान्य माणसाला कळणारच नाही. हे सगळं सामान्य माणसाला नुसतंच कळून भागत नाही तर सामान्य माणसाचा सक्रिय सहभाग त्यामध्ये अपेक्षित असतो. त्यासाठी सामान्य माणसाच्या मातृभाषेच्या अनुषंगानं भाषिक राज्य अपेक्षित असतं. शासनाला आपल्या व्यवहारात पारदर्शकता ठेवावी लागते. त्यांना समाज जाब विचारू शकतो. सामान्य माणसाला ज्ञात नसलेल्या भाषेत कायदेकानू झाले, शासकीय व्यवहार झाले, शिक्षण झालं तर तो जाबही विचारू शकत नाही. त्यात सहभागीसुद्धा होऊ शकत नाही आणि लोकशाहीचा विकास होत नाही. अंतिमत:, सामान्य माणसाचा सहभाग आणि लोकशाहीचा विकास यासाठी भाषिक राज्य अपेक्षित असते.

संस्कृती म्हणजे काय तर मानवनिर्मित प्रत्येक घटक संस्कृतीचा अंश असतो. निसर्गातली झाडं, पाणी, नद्या, डोंगर वगैरे म्हणजे संस्कृती नाही. कारण ही मानवाची निर्मिती नाही. तर मानवानं निर्माण केलेला प्रत्येक घटक म्हणजे भाषा, साहित्य, संगीत, पोषाख, खाद्यपदार्थ हे सारं म्हणजे संस्कृती होय. महाराष्ट्रातल्या गेल्या पन्नास वर्षांतल्या संस्कृतीचा लेखाजोखा घेताना पुढील काही मुद्यांचा प्रकर्षानं समावेश करावासा वाटतो.

आता, साठ सालापासून आजपर्यंत महाराष्ट्राचं सांस्कृतिक अवलोकन केलं तर हा हेतू सफल झाला आहे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शासनात मराठी आली आहे, शिक्षणसंस्थांमध्ये आली आहे; पण या प्रक्रियेमुळे सामान्य माणसाची सांस्कृतिक जागृती आणि सहभाग यामुळे भाषा संपन्न होणं हे किती झालेलं आहे? माझं अवलोकन असं आहे की या दोन्ही गोष्टी घडलेल्या नाहीत. त्या घडल्या असत्या तर अनेक अण्णा हजारे निर्माण झाले असते. त्या जर घडल्या असत्या तर इंग्रजी माध्यमांच्या शाळांऐवजी मराठी माध्यमांच्या शाळा वृद्धिंगत झाल्या असत्या. ते घडलं असतं तर महाराष्ट्रातली वाचनसंस्कृती समृद्ध झाली असती. ते घडलं असतं तर पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ, मराठवाडा दक्षिण महाराष्ट्र आणि कोकण हे जे महाराष्ट्राचे 'उपविभाग' आहेत, हे शब्दही नाहीसे झाले असते आणि मग पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र म्हणतो तसं आपण विदर्भाला पूर्व महाराष्ट्र म्हटलं असतं. महाराष्ट्राचे हे जे पोटविभाग आहेत, त्या सगळ्या पोटविभागांचं अविभागीकरण झालं असतं. अविभागीकरण ही साहित्यशास्त्रातली एक संज्ञा आहे. कलेच्या क्षेत्रातली ती अशी की, सारख्या उंचीच्या, सारख्या रंगरूपाच्या दोन नर्तिका जेव्हा एकाच वेळी एकच नृत्य करतात तेव्हा त्या दोन दिसतात; पण त्यांचं रंगरूप आणि त्यांचं नृत्य, मुद्रा एकच असल्यामुळे त्या दोन मिळून एकच झाल्या आहेत, असं वाटत राहतं. पण त्या एक होत नाहीत, त्याला अविभागीकरण अशी पारिभाषिक संज्ञा आहे. महाराष्ट्राचे जे उपप्रदेश आहेत त्यांचं अविभागीकरण झालेलं नाही, तर ते अजून सुटे विभागच राहिलेले आहेत. विदर्भ आणि कोकण यांच्या संदर्भात सतत चर्चा होते आणि त्याचे लाभ त्या त्या प्रदेशाला मिळतात. या सगळ्या उपविभागांमध्ये खरोखर ज्याच्याकडे सगळ्यात जास्त दुर्लक्ष होत आहे तो उपविभाग म्हणजे खानदेश होय.

सुधाकर गायधनी यांची एक कविता आहे, जी यशवंतराव चव्हाण आपल्या भाषणात नेहमी उद्धृत करत असत. ती म्हणजे,

''आम्ही चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो तर गिऱ्हाईक येईना,

आम्ही सोनं पांघरून चिंध्या विकायला बसलो तेव्हा गिऱ्हाईक संपता संपेना''

तर खानदेशातला मराठी समाज आरडाओरडा करत नाही, त्यामुळे त्याच्याकडे उर्वरित महाराष्ट्राचं पुरेसं लक्ष नाही. खानदेशी प्रादेशिक संस्कृती ही सातपुड्याच्या कुशीत पोसलेली आहे. त्यामुळेच इथे राहणारे हिंदी कवी अभिमानानं स्वतःचा उल्लेख 'सातपुडा के आँचल के कवी' असा करतात. तसं काही मराठी साहित्यक्षेत्रात घडलेलं नाही. महाराष्ट्रातल्या या उपविभागांचं संम्मिलन (संम्मेलन नव्हे!) व्हायला पाहिजे होतं ते गेल्या पन्नास वर्षांत झालेलं नाही.

एकभाषिक राज्य सामान्य माणसाच्या हितासाठी आहे, हे लक्षात न घेता उपप्रदेशांना विकसित होऊ द्यायचं आणि राष्ट्रीय जाणीव जपायची असं प्रत्यक्षात झालं नाही. मराठी अस्मिता महत्त्वाचीच आहे, पण ती राष्ट्रीय अस्मिता आणि उपप्रदेशाची अस्मिता यांची जोड करणारी असली पाहिजे. इकडेही आपल्याला लक्ष द्यावं लागेल. दुसरा आणखी महत्त्वाचा मुद्दा असा, की मुख्य राष्ट्रीय प्रवाहाशी मराठी अस्मिता सुसंगत करण्याचा एक मार्ग– ज्याच्याकडे आपल्या सगळ्यांचं दुर्लक्ष झालं आहे तो मार्ग– म्हणजे बृहन्महाराष्ट्राकडे लक्ष देणं. महाराष्ट्राचं भौगोलिक स्थान असं आहे की, त्याच्या तीन बाजूंना वेगवेगळी भाषिक राज्यं आहेत. खानदेशच्या जवळ गुजरात आहे, विदर्भाला लागून हिंदी भाषिक मध्यप्रदेश आणि छत्तीसगड आहे, जवळपासच ओरिसा आहे, दक्षिणेकडे आंध्रप्रदेश आणि कर्नाटक आहे. या भाषांबद्दल आपल्या मनामध्ये आस्था असली पाहिजे. इंग्रजी, फ्रेंच, रशियन भाषांमध्ये काय चाललं आहे, त्यांच्या वाङ्मयामध्ये काय चाललं आहे ते आपण समजून घेतो, पण कन्नडमध्ये काय चाललं आहे, तेलुगूमध्ये काय चाललं आहे, उडियामध्ये काय चाललं आहे, हिंदीत काय चाललं आहे, गुजरातीमध्ये काय चाललं आहे इकडे आपण पुरेसं लक्ष देत नाही. त्यामुळे बृहन्महाराष्ट्रात जो मराठी समाज आहे, तो हे काम करू शकतो. या प्रदेशामध्ये, मध्य-प्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक इथे मराठी समाज आहे, त्यांच्याकडे सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिकदृष्ट्या आपण जास्त लक्ष द्यायला पाहिजे. तसं लक्ष न दिल्यामुळे त्या त्या प्रांतात हे मराठी भाषिक उपरे होतात. मग कोणी संघर्ष करतात, कोणी नमतं घेतात, कोणी उदास राहतं, आपापल्या स्वभावाप्रमाणे आणि परिस्थितीप्रमाणे भूमिका घेतात. पण मुख्य महाराष्ट्रानं त्यांच्याकडे लक्ष दिलं तर मराठीच्या सरहद्दीचं संरक्षण करणारी ही ठाणी आहेत हे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे सामाजिक आणि शासकीय पातळीवर बृहन्महाराष्ट्रातील समाजाशी आपण जास्त संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. त्या त्या प्रदेशातल्या भाषिक संस्कृतीशी आपली देवाणघेवाण वाढेल आणि आपली अस्मिता एकारलेली होणार नाही. तिथली मंडळी मराठी संस्कृतीचा परिचय करून देतील, तिथले लोक आपल्या प्रादेशिक भाषेत मराठी संस्कृतीचा परिचय करून घेतील. त्यामुळे बृहन्महाराष्ट्रातील मराठी लोक आपले सांस्कृतिक दूत म्हणून कामगिरी बजावू शकतील. तिथल्या लेखकांच्या मनामध्ये जो संकोचगंड आहे, तो दूर होईल. तिथे जे अभ्यासक्रम आहेत ते भाषांतरप्रधान आणि तौलनिक अभ्यासाशी संबंधित असतील. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर इथल्या विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांचं अनुकरण त्यांनी करता कामा नये. त्यांनी अनुवादविद्या आणि तौलानिक साहित्याभ्यास यावर जोर दिला पाहिजे. यासाठी आपण त्यांना पाठबळ दिलं तर ते हे करू शकतील. मुख्य म्हणजे त्याला केवळ भाषिक आणि वाङ्मयीन परिमाण राहणार नाही तर मोठं सांस्कृतिक परिमाण मिळेल. बृहन्महाराष्ट्रातील मराठी केंद्रं सर्वतोपरी जपायला पाहिजेत. आपल्या व्यवहारात त्यांना जितका वाव देता येईल, तितका तो दिला गेला पाहिजे.

सामान्य माणसाची शक्ती फार मोठी आहे पण; दुर्दैवानं त्या सामान्य माणसाच्या शक्तीची जाणीव त्या सामान्य माणसालाच नाही. भाषिक राज्यांनी सामान्य माणसाचा आत्मविश्वास वृद्धिंगत केला पाहिजे. आपण नेहमी सामाजिक दुराचाराबद्दल बोलतो. भ्रष्टाचार, जातीयता, अकर्मण्यता इत्यादी. मला नेहमी असं वाटतं की, सामान्य माणसाच्या इतर शक्ती कमी आहेत, असं आपण समजतो. हे खरं नाही. पण अनाचार करण्याची सामान्य माणसाची शक्ती कमी आहे, हे मात्र लक्षात ठेवलं पाहिजे. सामान्य माणूस हा अल्पसंतुष्ट आहे त्यामुळे तो मोठे घोटाळे करत नाही. मोठे घोटाळे करणारी माणसं मोठीच असतात. उलट, सामान्य माणूस पापभीरू आहे. रास्त मार्गानं जे मिळेल त्याच्यात समाधान मानायचं. जे अतृप्त असतात ते भ्रष्टाचाराला प्रवृत्त होतात. सामान्य माणूस भ्रष्टाचारी नाही. नाइलाजानं त्याला भ्रष्टाचारात ओढलं जातं. तो स्वतःहून करत नाही. सामान्य माणूस हा अंतरंगानं शुद्ध, नीती आणि कायदे, शिष्टाचार यांचा सत्कार करणारा आहे. तथाकथित मोठ्या माणसांपेक्षा तो निःस्वार्थी आहे. फक्त त्याला आपल्या शक्तीची जाणीव नाही. ती जाणीव त्याला कोणी करून दिली तर हा सामान्य माणूस या समाजाला दूरवर प्रगतिपथावर घेऊन जाऊ शकतो.

इतिहासकाळात असं सतत घडलेलं आहे. वारकरीपंथानं सामान्यांची अस्मिता जागृत केली. शिवाजी महाराजांनी केली. म्हणून असं म्हणतात की नामदेव महाराजांनी तेराव्या शतकात आध्यात्मिक लोकशाही आणली. रामदासस्वामींनी समाजाला संघटित करून शक्तिमान केलं. अगदी तमासगीर, शाहीर यांच्यातही भिन्न जातिधर्माचे लोक होते. राम जोशी, अनंत फंदी ब्राह्मण होते, सगन-भाऊ मुस्लीम होते, परशुराम शिंपी होते.

''शब्द शक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,

टेकुनिया ती जनता शिरशावरी जग उलथुनिया देऊ कसे ''

हा विश्वास आधुनिक काळातील केशवसुतांनी व्यक्त केला आहे. मराठीतले

# शिक्षणाची पुनर्रचना आवश्यक

## प्रा. मिलिंद जोशी

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे असे मानले जाते. शैक्षणिक साधनांचा आणि सुविधांचा अभाव हे ग्रामीण मागासलेपणाचे कारण असून बहुजन समाजाची उन्नती साधायची असेल तर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार आवश्यक आहे हे जाणलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, मामासाहेब जगदाळे यांच्यासारख्या द्रष्ट्या माणसांनी शिक्षणसंस्था स्थापन केल्या. 'कमवा-शिका' योजनेला प्राधान्य देऊन ग्रामीण विद्यार्थ्यांची अस्मिता जागृत ठेवली. पण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची पोटे भरतील ही अपेक्षा मात्र इथल्या कुचकामी शिक्षणव्यवस्थेने फोल ठरवली. गेल्या साठ वर्षांतील महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीचे अथवा अधोगतीचे चिंतन करताना भारतीय पातळीवरील शिक्षणाचे चिंतन करणे आवश्यक आहे.

आज देशात ४०८ विद्यापीठे आहेत. (त्यात २२८ स्टेट युनिव्हर्सिटीज, २४ सेंट्रल युनिव्हर्सिटीज, १९ प्रायव्हेट युनिव्हर्सिटीज, ९९ डीम युनिव्हर्सिटीज, ३३ इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इंपॉर्टन्स आणि ५ स्टेट इंपॉर्टन्स आहेत) आणि १८०६० महाविद्यालयातून १ कोटी १० लाख २८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आज शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींची संख्या ४०.५ टक्के एवढी आहे. शिक्षकांच्या संख्येचा विचार करता १९४७ साली या देशात शिक्षणक्षेत्रात २५ हजार शिक्षक कार्यरत होते. १९६४ साली ही संख्या ७७ हजारांवर गेली. आज ४ चार लाख ८८ हजार शिक्षक आपले योगदान देत आहेत. आकडेवारीनुसार ही संख्यात्मक प्रगती विस्मयचकित करणारी असली तरी आपण गुणात्मक प्रगती करू शकलो नाही हे वास्तव आहे. सतरा ते तेवीस वर्षे वयोगटाचा विचार करताना आपल्या असे लक्षात येते, की फक्त ९ टक्के विद्यार्थीच उच्चशिक्षण घेत आहेत. उद्याच्या शिक्षणपद्धतीचा विचार करताना ९१ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणात कसे सहभागी होतील या दृष्टीने पावले उचलणे आवश्यक आहे.

२०२० साली विकसित राष्ट्र होण्याची स्वप्ने आपण पहात आहोत. विकसित राष्ट्र

---

(पान ३ वरून)

दुसरे केशवसुत म्हणजे बा.सी.मर्ढेकर. यांनीसुद्धा हा विश्वास आपल्या काव्यातून प्रगट केलेला आहे,

'अखेर जरी मग टक्कर घेता, युगायुगाचे फुटेल भाल
अशाश्वताच्या शमशेरीवर, शाश्वताचीही तुटेल ढाल'.

इथेही सामान्य माणसाचा गौरव मर्ढेकरांनी केलेला आहे. आपल्याला असं दिसेल की, ज्ञानेश्वर महाराज असोत, नामदेव महाराज असोत, तुकाराम महाराज असोत, समर्थ रामदास असो, शिवाजी महाराज असोत किंवा कोणतेही शाहीर असोत किंवा केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंतचे आधुनिक कवी असोत, या सगळ्यांना सामान्य माणसाच्या शक्तीची जाणीव होती. आज सामान्यांना जागृत करण्याऐवजी त्यांना बहकावण्याचं काम समाजात सुरू आहे. राजकीय हेतूसाठी त्यांना वापरलं जातं. व्यापारी हेतूसाठी त्याला चंगळवादी केलं जात आहे, सामाजिक गैरहेतूंसाठी त्याला मनोरंजनाचं व्यसन लावलं जात आहे. समाजात मनोरंजनाचा जो अतिरेक झाला आहे, सकाळपासून रात्रीपर्यंत टीव्ही पाहणं, इतक्या मनोरंजनाची गरज नाही. हे म्हणजे तुमचं हलवायाचं दुकान आहे म्हणून रात्रंदिवस तुम्ही मिठाई खाणं! ही काही शहाणपणाची गोष्ट नाही. ती घातक आहे. त्यामुळे विज्ञानयुगात असून आपण वैज्ञानिक दृष्टी स्वीकारत नाही, तर मनोरंजनाची दृष्टी स्वीकारतो. दूरदर्शनवर तुम्ही करमणुकीचा कार्यक्रम पाहत असाल तर त्याचा आनंद घेणं बरोबर आहे, मग ते नृत्य, संगीत असो किंवा नाटक, सिनेमा, क्रिकेटची मॅच काहीही. पण भूकंप, अवर्षण, अपघात, दहशती हल्ले यांची दृश्यंही तुम्ही करमणूक म्हणून पाहत असाल तर तुमची संवेदना बोथट झाली आहे, असं मी समजतो. मालिकांमधील प्रेमप्रकरण ज्या भूमिकांमधून पाहायचं त्याच भूमिकेतून तुम्ही मुंबईवरील हल्ल्याची दृश्यं पाहणं ही संवेदनहीनतेची वृत्ती आहे. सामान्य माणसाला फार पद्धतशीरपणे करमणूकवादी, संवेदनाशून्य, विचारशून्य आणि भावनाशून्य केलेलं आहे. पद्धतशीरपणे ही प्रक्रिया सुरू आहे. मार्क्सवादी ज्याप्रमाणे धर्म ही अफूची गोळी आहे असं म्हणत त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमं सर्वसामान्यांना मनोरंजनाची अफूची गोळी देत आहेत. या सामान्य माणसाची केवळ भाषाच व्यवहारात येऊन चालणार नाही तर या सामान्य माणसाचं वर्चस्व सगळ्या जीवनव्यवहारात आलं पाहिजे.

१९४८ पासून महाराष्ट्राबद्दल उर्वरित भारतामध्ये फार मोठे गैरसमज आहेत. म्हणूनच मराठी माणूस पंतप्रधान होऊ शकत नाही. यशवंतरावांसारखा कर्तबगार माणूसही पंतप्रधान झाला नाही, याचं एक कारण म्हणजे मराठी समाजाबद्दल उर्वरित देशात असलेले गैरसमज. आपण ही मराठी अस्मिता विकसित करत असताना महाराष्ट्राच्या उपप्रवाहांकडे लक्ष दिलं, राष्ट्रीय प्रवाहांशी संधान ठेवलं, बृहन्महाराष्ट्रातील समाजाला प्रोत्साहन दिलं आणि सामान्य माणसाला विचारप्रवृत्त केलं तर महाराष्ट्र ही भारतीय राजकारणातील महासत्ता होईल.

शब्दांकन : **ममता क्षेमकल्याणी**

होण्यासाठी निदान वीस टक्के विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेणे आवश्यक आहे. वीस टक्के लोकांना उच्च शिक्षण द्यायचे झाले तर आपल्या पायाभूत सुविधांमध्ये आपण दुपटीने वाढ करणे आवश्यक आहे. पुढच्या बारा-तेरा वर्षांमध्ये विद्यापीठांची संख्या आठशे व्हायला हवी. महाविद्यालयांची संख्या छत्तीस हजार व्हायला हवी. फ्रान्स, जर्मनी या देशांमध्ये पन्नास टक्क्याहून जास्त विद्यार्थी उच्च शिक्षणात सहभागी होतात यावरून आपल्या लक्षात येईल की, आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे.

एकूणच शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भात शिक्षणतज्ज्ञ, राज्यकर्ते, संस्थाचालक, शिक्षक यांच्या मनात संभ्रम आहेत. या अनुषंगाने मी काही प्रश्न विचारू इच्छितो.

१. कोणत्याही एका विशिष्ट औद्योगिक क्षेत्रात आपणास उत्कृष्ट स्थान का प्राप्त होऊ शकले नाही?

२. स्वातंत्र्योत्तर काळात भारत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपला ठसा का उमटवू शकला नाही?

३. स्वातंत्र्यपूर्व काळात रवींद्रनाथ टागोरांच्या रूपाने आपल्याला साहित्यातले नोबेल पारितोषिक मिळाले आणि डॉ. सी.व्ही. रामण यांच्या रूपाने विज्ञानातले नोबेल पारितोषिक मिळाले. शिक्षणात इतकी प्रगती केलेली असतानाही स्वातंत्र्योत्तर काळात आम्हाला एकही नोबेल पारितोषिक का मिळू शकले नाही?

४. तीन हजारांपेक्षा जास्त संशोधन संस्था, ४०८ विद्यापीठे आणि १८०६४ महाविद्यालये असताना आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाही क्षेत्रामध्ये अव्वल दर्जाचे स्थान का मिळवू शकलो नाही?

५. जागतिक पातळीवरील औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचे जेव्हा आपण सिंहावलोकन करतो तेव्हा असे दिसते, की जगात दरवर्षी तेरा लाख इंजिनीयर तयार होतात. त्यातले चव्वेचाळीस हजार भारतात तयार होतात. असे असूनही औद्योगिक क्षेत्रातील विकासात आपण जगात दहाव्या क्रमांकावर का आहोत?

६. औद्योगिक क्षेत्रासाठी लागणारे पंच्याण्णव टक्के तंत्रज्ञान आपण परदेशातून घेतो. आपले या क्षेत्रातील योगदान पाच टक्केच का आहे?

देशातील अनेक मान्यवर आज महासत्तेची स्वप्नं दाखवत आहेत. या देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या केवळ दहा टक्के आहे. त्यात ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांचा सहभाग अर्ध्या टक्क्याहून कमी आहे. इंजिनीयरिंग-मेडिकलची गगनाला भिडलेली फी आणि डोनेशनची पेटी आणि खोक्यातली भाषा आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कल्पनेपलीकडची आहे. त्यामुळे त्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे जाता येत नाही. एम.ए., एम.कॉम. आणि बी.एस्सी. वरच समाधान मानावे लागते. जागतिकीकरणाच्या या प्रचंड स्पर्धेत केवळ एवढ्या ज्ञानावर ही मुले कशी टिकणार?

मध्यंतरी महाराष्ट्रातल्या एका नामवंत वृत्तपत्रात आलेली बातमी खूप धक्कादायक होती. एका न्यायालयात पट्टेदार, बेलिफ पदासाठी अर्ज आले होते. त्यातले नव्वद टक्के अर्ज एम.ए., एम.कॉम, बी.एस्सी. झालेल्या विद्यार्थ्यांचे होते. बेकारीच्या प्रचंड लाटेचे स्वरूप यावरून लक्षात येऊ शकते. आयटी क्षेत्रातील केवळ दोन टक्के अभियंत्यांना महिन्याला लाखो रुपयांचा पगार मिळतो म्हणून हरखून जाण्याचे कारण नाही. सारे काही आलबेल आहे असेही मानण्याचे कारण नाही.

तरुणपिढीचे सर्वात जास्त लोक आमच्याकडे आहेत म्हणून आम्ही महासत्तेच्या दिशेने वाटचाल करू शकतो असा आशावाद विचारवंत मंडळी जागवीत असली तरी त्यांनी गंभीरतापूर्वक चिंतन करणे आवश्यक आहे असे वाटते. क्रियाशील लोकसंख्या म्हणून ज्या तरुणवर्गाकडे ही मंडळी पाहत आहेत. त्यांचे सर्व पातळ्यांवर योग्य व्यवस्थापन होऊ शकले नाही तर महासत्तेचे स्वप्न तर दूरच राहील, पण या पिढीच्या भावनेचा जो उद्रेक असेल तो जास्त भयावह असेल. ही पिढी त्यांच्या ज्येष्ठांना कधीही माफ करणार नाही.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात विचारांचे दोन प्रवाह आहेत.

१. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था आणि उदारीकरणामुळे जगाचे खेडे झाले आहे. नोकरीच्या फार मोठ्या संधी सर्वांसाठी उपलब्ध आहेत असे बोलले जाते. पण बेकारांची संख्याही मोठी आहे.

२. औद्योगिक क्षेत्रातील लोकांचे म्हणणे असे आहे, की नोकऱ्या खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. पण त्यासाठी योग्य गुणवत्तेची माणसं मिळत नाहीत. नोकऱ्या उपलब्ध आहेत म्हणून त्या अपात्र लोकांना बहाल करण्यात आम्हाला स्वारस्य नाही.

या परस्परविरोधी विचारप्रवाहांच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध मनुष्यबळ आणि त्यांची गुणवत्ता याबाबत विचार होणे आवश्यक आहे. आयटी क्षेत्रातील जाणकारांचे मत असे आहे, की वरवर पाहता भारतातील प्रचंड मनुष्यबळ आकर्षक वाटते पण त्यातील केवळ वीस टक्के मनुष्यबळच चांगल्या प्रतीचे आहे. सध्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील केवळ पंचवीस टक्के पदवीधर आणि इतर क्षेत्रातील दहा ते पंधरा टक्के पदवीधर चांगल्या नोकरीस पात्र आहेत. भारतातल्या चौदाशे अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्रतिवर्षी चार लाख पदवीधर तयार होतात पण वर्ल्ड क्लास टॅलेंट म्हणून ज्यांची निवड करता येईल अशा अभियंत्यांची संख्या वीस ते पंचेचाळीस हजारांच्या आसपास आहे. जाणकारांच्या मतानुसार, २०३० सालापर्यंत आयटी उद्योगातील कंपन्यांना आपले शेअर बाजारातील स्थान टिकवण्यासाठी २.१ एक दशलक्ष एवढ्या मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे.

पण या मनुष्यबळात ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग किती असेल? बाजारात पाच लाख नोकऱ्या आहेत म्हणून त्या पाच लाख लोकांना उपलब्ध होतील असे नाही. त्यासाठी लोकांना आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. उपलब्ध मनुष्यबळाचे उपयुक्त मनुष्यबळात रूपांतर करण्यासाठी राष्ट्रीय गरज मानून शिक्षणाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

माझा एक मित्र तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम पाहतो. त्याच्या कार्यालयात बसलो असताना मुंडासे घातलेला एक शेतकरी त्याच्याकडे आला. तावातावाने त्याला म्हणाला, ''एवढं पोराला एम.ए. होण्यासाठी तुमच्या कॉलेजात पाठवलं. तुम्ही त्याला साधी नोकरी देऊ शकत नाही. हा गेली सहा महिने नुसता नोकरीसाठी अर्ज करतोय. याचं कशातही लक्ष नाही. शिक्षण घेण्यापूर्वी हा गाई-म्हशी सांभाळायचा. त्यांच्या धारा काढायचा. शेतात दारं धरायचा. गोठा साफ करायचा. आता हा काहीच करत नाही. नुसता घुम्यासारखा बसून असतो. तुमच्या शिक्षणानं माझ्या पोराला आयुष्यातून उठवलं. तुमची पदवी त्याला पोट भरण्यासाठी एक नोकरी देऊ शकत नाही.'' माझा प्राचार्य मित्र हतबल वाटत होता. तो म्हणाला, ''अहो, पदवी देणं एवढंच आमचं काम आहे. नोकरी देणं हे आमचं काम नाही. मी त्याला फार तर पुढील शिक्षणासाठी प्रवेश देऊ शकतो.'' त्यावर तो शेतकरी उद्विग्न होऊन म्हणाला, ''माझ्या पोराचं झालं एवढं वाट्टोळं पुरं आहे.'' हे एकच उदाहरण आपल्या शिक्षणव्यवस्थेची आजची स्थिती जाणून घेण्यासाठी पुरेसे आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर आलेले अपयश झाकून राहिलेले नाही. शिक्षणातून समाजातली दरी नष्ट होईल अशी या देशातील विचारवंतांची धारणा होती. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. पण आज शिक्षणामुळेच दरी वाढते आहे असे चित्र दिसते. ग्रामीण भागातला विद्यार्थी, शहरी भागातला विद्यार्थी, साध्या विद्यापीठातला आणि पंचतारांकित विद्यापीठातला विद्यार्थी, पारंपरिक शिक्षण घेणारा विद्यार्थी आणि उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी, दऱ्याखोऱ्यातून, पाण्यातून प्रवास करत शाळेपर्यंत पोचणारा विद्यार्थी आणि ए.सी. बसमधून शाळेला पोचणारा विद्यार्थी अशी दरी वाढतच चाललेली आहे. शिक्षकावरील अशैक्षणिक कामाचा बोजा वाढलेला आहे. उदरनिर्वाहाची जोडसाधने शोधल्यामुळे त्याची अध्यापनातली एकाग्रता कमी झालेली आहे. शिक्षणक्षेत्रातला राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळे नेत्यांची मर्जी राखत त्याला ज्ञानदानाचे पवित्र काम पार पाडावे लागत आहे. त्यामुळे त्याच्या समाजातील प्रतिष्ठेला धक्का पोचलेला आहे. या साऱ्यातून एक अनास्था आणि निराशावाद पसरताना दिसतो. उत्तम नागरिक घडवण्यापेक्षा पोराला पुढच्या वर्गात ढकलणे याच कर्तव्याला महत्त्व प्राप्त झालेले आहे. शिक्षणक्षेत्रात 'मार्क्स'वाद फोफावला आहे. ज्याला त्याला आपल्या मुलाने इंजिनीयर आणि डॉक्टरला व्हावे असे वाटू लागले आहे. त्यामुळे एकाच वाटेने जाणाऱ्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळे नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यातून बेकारांची संख्या वाढते आहे.

उद्याच्या शिक्षणाचा विचार करताना काही आव्हाने शिक्षणक्षेत्रासमोर आहेत. त्यांचा विचार केला पाहिजे.

- आमची शिक्षणपद्धती लवचिक असली पाहिजे. प्रत्येकाला हव्या त्या शाखेतले ज्ञान घेता आले पाहिजे. शिक्षणक्षेत्रात आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अनेक विद्याशाखांची मदत लागते. केवळ एका विद्याशाखेमुळे हा विकास होऊ शकत नाही. For that we need to build bridges rather than walls between various disciplines.
- स्पर्धेच्या युगात शिक्षकांचा दर्जा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. Teachers are the architect of the nation असे म्हटले जाते. त्यामुळे शिक्षक एकूण शिणकाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन कसा निर्माण होईल त्यांची इच्छाशक्ती कशी वाढेल, त्यांना प्रशिक्षित होण्यासाठी कशी संधी मिळेल यावर भर द्यावा लागेल.
- औषधांवर जशा एक्स्पायरी डेट येतात तशा इथून पुढच्या काळात पदव्यांवर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कालसुसंगत अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवणे जरुरीचे आहे.
- आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी 'गुणवत्ता' हाच एकमेव निकष आहे. त्यामुळे पदवी देण्या-बरोबरच त्याला विविध कौशल्ये शिकवून त्याचे स्पर्धेच्या युगातले स्थान बळकट करणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने शिक्षण-क्षेत्राला पावले उचलावी लागणार आहेत.
- मूल्यशिक्षणाचा एखादा तास घेऊन चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडवण्याचा जो खटाटोप सुरू आहे तो हास्यास्पद आहे. आचारविचार आणि उच्चारातली एकवाक्यता जेव्हा विद्यार्थ्यांना घरात, शाळेत, समाजात पाहायला मिळेल त्यावेळेसच त्यांच्या मूल्यांसंदर्भातल्या संकल्पना अधिक स्पष्ट होतील.
- शिक्षणसंस्था आणि समाज यांच्यामधल्या भिंती पाडून टाकण्यासाठी इथून पुढे सज्ज राहावे लागेल. शिक्षणसंस्थांना, विद्यापीठांना समाजाच्या प्रश्नांशी भिडावे लागेल. सामाजिक प्रश्नाची मानसिकता तयार झाली तर शिक्षणसंस्था आणि विद्यापीठांविषयी विश्वासार्हतेची भावना समाजात निश्चित दृढ होईल. विद्यापीठातून पीएच.डी. संपादन करणाऱ्यांचे फोटो प्रत्येक आठवड्यात नामवंत वृत्तपत्रात छापून येतात. पीएच.डी.साठीचे विषयही अगम्य आणि अनाकलनीय असतात.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रयत्न गंभीर असताना किती विद्यापीठात या संदर्भातले संशोधन झाले. वस्तुनिष्ठ माहिती संशोधकांपर्यंत, शासनापर्यंत आणि सामाजिक संस्थांपर्यंत पोचवण्यात आली. समाजापुढील जटील प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या कामी शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे.

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी ज्या प्रकारचे नियोजन करण्याची आवश्यकता होती. ते नियोजन गेल्या साठ वर्षांत आपण करू शकलो नाही. अजूनही भारतातली पस्तीस टक्के जनता निरक्षर आहे. त्यातला महाराष्ट्राचा वाटा चिंतन करायला लावणारा आहे.

'साठी बुद्धी नाठी' असे म्हटले जाते. साठ वर्षे पूर्ण होत असताना शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्राने गंभीर आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. ज्ञानोबा, तुकोबांची भाषा महाराष्ट्राची ज्ञानभाषा झाली पाहिजे अशी अपेक्षा महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाणसाहेबांनी व्यक्त केली होती. महाराष्ट्रात मराठी ज्ञानभाषा होणे तर दूरच शिक्षणातून ती हद्दपार होते की काय अशी परिस्थिती निर्माण होते आहे. नारळीकर, माशेलकर, गोवारीकर, भटकर मराठीतून शिकले आणि जगन्मान्यता पावले. आजच्या पालकांना, शिक्षकांना, संस्थाचालकांना मराठीची इतकी भीती का वाटावी? भयगंडातून जो न्यूनगंड निर्माण होतो तो विकासाला जास्त मारक ठरतो. ग्रामीण प्रतिभेनेच महाराष्ट्र घडवला आणि भारताच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे याची जाणीवही शिक्षणातून निर्माण झाली पाहिजे. करायला खूप मोठा वाव आहे. गरज आहे ती इच्छाशक्तीची आणि कृतिशीलतेची.

---

**– प्रा. मिलिंद जोशी**
बी १/१२, रविराज टेरेस
सुखसागरनगर, कात्रज, पुणे-४६
मोबाईल – ९८५०२७०८२३

**ग्रंथाली**




## प्रकाशवाट

**वंदना करंबेळकर**

वंदना करंबेळकर यांच्या या अनुवादित कथा सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकट होतात. त्यांतील नायिका सर्वसाधारण जीवनातील कोंडमाऱ्याचे अनुभव घेताना दमदारपणा दाखवतात; त्या ओघात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जातो.

मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये
घरपोच ९५ रुपये

## माणूस माझे नाव

**अनुराधा गानू**

बाबा आमटे यांच्या कविता, मॅगसेसे अवॉर्ड स्वीकारताना त्यांनी केलेलं भाषण, अनुराधा गानू यांनी बाबा आणि साधना आमटे यांच्यावर लिहिलेली गाणी आणि गद्यनाट्य यांनी साकारलेले हे लेखन म्हणजे सर्व घटकांच्या अनुभूतीचा सर्जनशील आविष्कार आहे.




मूल्य ६० रुपये
सवलतीत ३५ रुपये
घरपोच ५० रुपये

# आजचे पसायदान

## प्रा. वि.ह. क्षीरसागर

*वाईट तितुके इथे पोसले*
*भलेपणाचे भाग्य नासले*
*या पृथ्वीच्या पाठीवर ना*
*माणसास आधार... उद्धवा, अजब तुझे*
*सरकार*

कविवर्य ग.दि.मांच्या 'जगाच्या पाठीवर' ह्या चित्रपटातील प्रसिद्ध गीतातील हे एक कडवे. एक कटू सत्य. वस्तुत: अशी वेळ माणसावर विसाव्या शतकात येऊ नये म्हणून तेराव्या शतकातही त्यांच्या वाक्‌यज्ञाच्या सांगतेच्या वेळी ज्ञानेश्वरांनी पसायदानात मोठे मोलाचे मागणे मागितले आहे. तेराव्या शतकातले हे मागणे काय फक्त तेराव्या शतकासाठीच होते? स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून जाणारे ते एक अलौकिक मागणे आहे. मग आज एकविसाव्या शतकात ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची वाट पुसत मागणे मागायचे झाले तर काय मागणार?

'जे खळाची व्यंकटी सांडो' असे म्हणण्याची आज अधिक गरज निर्माण झाली आहे. ज्या खलपुरुषाचा ज्ञानेश्वर कधी विचारसुद्धा करू शकले नसते असे खल खंडोगणती निर्माण झाले आणि होतील. ICB.M सारखी अस्त्रे निर्माण करणारा, धर्मांध होऊन मनुष्यबॉम्ब (Human Bomb) बनून स्वत:चा जीव धोक्यात घालणारा, अशा माणसाचा ज्ञानेश्वर विचार तरी करू शकले असते काय? एका अर्थाने कोणताही कवी, लेखक, कलाकार हा त्याच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वांगीण परिस्थितीची एक निर्मिती असतो. आज सर्व जगात या ना त्या कारणाने निर्माण झालेला दहशतवाद हा ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेल्या खलाची किती पटीने वाढवलेली आवृत्ती म्हणायची? ह्यांची सत्कर्मी रती कशी वाढायची? ज्ञानेश्वर पसायदानाच्या सुरुवातीलाच सर्व जगाला जिंकून घेतात, ते त्यांनी जे मागणे मागितले आहे त्या विश्वात्मक देवाची सर्व विश्वाला मान्य होईल अशी एक भव्यदिव्य कल्पना मांडून. हे मागणे कुणा शंकराला, गजाननाला किंवा कोणत्याही एका धर्माच्या, पंथाच्या अधिष्ठा देवतेला नाही, त्या तर ते मागणे ज्याच्या कृपेने विश्व स्वधर्म सूर्य पाहू शकेल अशा विश्वात्मक देवाकडे आहे. यातले विश्व, स्वधर्म आणि सूर्य – हे तिन्ही शब्द विलक्षण महत्त्वाचे. विश्व – देशाची, प्रांताची अशी भौगोलिक मर्यादा ओलांडणारी कल्पना, स्वधर्म – अशा विश्वाचा त्याला म्हणजे त्यातील चराचराला धारण करणारा, पोषण करणारा धर्म. सूर्य – आकाशातील चिरंतन सत्य, चैतन्य देणारे अचल सत्य. म्हणून इथली मांदियाळी – मंडळी ही त्या ईश्वरनिष्ठांची मांदियाळी. ह्यातला ईश्वर किंवा विश्वात्मक देव म्हणजे सकल मानवजातीचे कल्याण चिंतणारी एक प्रेमस्वरूप शक्ती. ज्या शक्तीमध्ये धर्म, सत्ता, पंथ, वर्ग, कातडीचा रंग ह्यासारख्या संकुचित भावनांना, विचारांना अजिबात स्थान नाही अशी शक्ती. आज पसायदानात ह्यापेक्षा अधिक भव्य काय मागणार? उलट पसायदानातील प्रत्येक ओवीमधली मागणी अधिक तीव्रतेने मागण्याची वेळ आली आहे.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धा-नंतरच्या मनुष्यसंहारानंतर एका अर्थाने अशी मागणी, असे पसायदान माणसाने मागितले. पहिल्या महायुद्धानंतर League of Nations ची स्थापना झाली तरीही दुसरे महायुद्ध झालेच. आपण United Nations Organizationची स्थापना केली. तरी काय झाले? दोन्ही महायुद्धांत झाला नसेल एवढा मनुष्यसंहार, एवढ्या वेगात ११ सप्टेंबर २००१ ह्या तारखेने करून दाखवला. जन्मांध परवडला, धर्मांध किंवा सत्तांध परवडत नाही म्हणतात तेच खरे. आज पसायदानात ही धर्मांधता, सत्तांधता दूर होऊन माणसाचे डोळे लवकरच उघडे होवोत ही मागणी करणे भाग आहे. अशा वेळी आठवण होते ती जॉर्ज ऑर्वेल ह्या इंग्लिश लेखकाची. त्याच्या Animal Farm व 1984 ह्या दोन्ही पुस्तकांची. त्याच्या प्रसिद्ध वचनांची. त्यांनी म्हटले आहे, Power Corrupts and absolute Power Corrupts absolutely.

सत्तेच्या जीवघेण्या शर्यतीत आंधळेपणाने भाग घेणाऱ्यांना 'भूता परस्परें पडो मैत्र जीवाचे' हा मंत्र आज आणि पुढेही सांगावा लागणारच. तोंडाने All Men Are Equal म्हणणारे प्रसंग पडताच Animal Farm मधल्या दुरुस्तीप्रमाणे Some are more equal होऊन जातात. पहिले वचन व्यासपीठापुरतेच जिवंत राहते. म्हणूनच पापाचा अंधार दूर झाल्यावर, विश्व स्वधर्म सूर्य दिसल्यावर 'जो जो वांछिल तो ते लाहो। प्राणिजात' अशी प्रार्थना आजच्या काळात उचित होणार नाही का? व.पु. काळे ह्यांनी एके ठिकाणी (आपण सारे अर्जुन) म्हटल्याप्रमाणे, खऱ्या धर्माचे नाते असते श्रेयसशी, राजकारणाची सोयरीक असते प्रेयसशी.

खरे तर रामासाठी रावण, कृष्णासाठी कंस हे खलपुरुषपुराण चालूच राहते. कारण ह्या विश्वाच्या डोहातल्या काळ्या पाण्यात एक कालिया नेहमीच वस्तीला असतो. अगदी लहान मुले म्हणजे देवाघरची फुले प्रसंगी किती क्रूर होऊ शकतात हे दाखवण्यासाठी विल्यम गोल्डिंगसारख्या नोबेल पारितोषिक विजेत्या इंग्लिश लेखकाने द लॉर्ड ऑव्ह द फ्लाईज नावाची एक विलक्षण प्रभावी कादंबरी

प्रसिद्ध केली. माणूस जन्माला येतो तो कोणत्याही जाती, धर्माचे, पंथाचे, भाषेचे बंधन न घेता. आपणच त्याला ह्या निरनिराळ्या बंधनांची लेबले लावून जखडून टाकतो. इथे गीतेतला एक श्लोक आश्वासक वाटतो. (यदा यदाहि धर्मस्य...) 'अधर्म उठतो भारी तेव्हा मी जन्म घेतसे.' तर तो 'मी' जन्माला यावा म्हणून संतांनी नेहमीच मागणी केली आहे. तीच आपली मागणी असायला हरकत नाही.

संत नामदेवांनी 'अहंकाराचा वारा न लागो राजसा / माझ्या विष्णुदासा भाविकासी' (नामदेव गाथा) असे म्हणून आजच्या वर्तमानातील अनेक अरिष्टांचे मूळ ह्या अहंकारात आहे, तोच दूर करण्याची कळकळीची विनंती केली आहे. रामदासांनी तर तपशीलात जाऊन रोजच्या व्यवहारासाठी जी मागणी मागितली आहे तिच्या विचाराचा संस्कार बालवयातच व्हायला हवा. 'कोमल वाचा दे रामा। विमल करणी दे रामा।। हितकारक ते दे रामा।। जनसुखकादरी दे रामा। उत्तम गुण मज दे रामा।'' ही प्रार्थना मुळातून पूर्ण नुसती मागणी करण्याची नसून रोजच्या व्यवहारात कृतीमध्ये रूपांतर करण्याची आहे. तुकाराम तर त्यांच्या एका अर्थाने जे पसायदान आहे त्यात म्हणतात,

*हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा*
*गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी*
*न लगे मुक्ति आणि संपदा। संत संग देई सदा*
*तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावी आम्हीस।।*

यातील मुक्ती सामान्यांना न कळणारी आणि संपदा कळणारी. परंतु तुकाराम म्हणतात ह्या दोन्ही गोष्टी नकोत. फक्त संतसंग दे. खरे संत कोणते? जे खऱ्या अर्थाने पृथ्वीतलावरील ईश्वरी अंशाचे रखवालदार आहेत. माणुसकीच्या अन्यायाविरुद्ध आपले संग्रामशील माणूसपण जपणारे सज्जन आहेत. तुकारामाच्या ह्या अभंगाचे वैशिष्ट्य असे आहे की त्या संतसंगासाठी आम्हाला पुन्हा गर्भवासी व्हावे लागले तरी आम्ही सुखाने तसे होऊ असे म्हणून त्यांनी पृथ्वीवरील जगण्याचे दु:ख मानले नाही.

अशीच प्रभावी मागणी आधुनिक कवींनीपण केली आहे. कविवर्य कुसुमाग्रजांनी 'स्वातंत्र्यदेवीची विनवणी' नावाची एक कविता १९९७ मध्ये, म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्याला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लिहिली होती. एका अर्थाने कुसुमाग्रजांचे ते पसायदानच आहे. हे आवाहन प्रत्येक जबाबदार नागरिकाला केलेले आहे. सगळी कविता फटक्याच्या (एक काव्यालंकार : स्वर्गंगा – हरिभागिनी) स्वरूपात लिहून चांगलाच फटका तात्यांनी मारला आहे. त्यामुळे त्याला गती प्राप्त झाली आहे.

*सूर्यकुलाचा दिव्य वारसा प्रिय पुत्रांनो तुम्हा मिळे*
*काळोखाचे करून पूजन घुबडाचे व्रत करू नका।।*
*जनसेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गृहा*
*मेजाखालून मेजावरतून द्रव्य कुणाचे लुटू नका।।*
*प्रकाश पेरा आपुल्या भवती दिवा दिव्याने पेटतसे।*
*इथे भ्रष्टता तिथे नष्टता शंखच केवळ फुंकू नका।।*

अगदी रोजच्या जीवनातील ही आचारसंहिता आज पाळायला नको? बा.भ. बोरकर त्यांच्या कानफाट्याच्या फटक्यात अशीच मागणी करतात.

*कलावंत मागतो प्रसिद्धी शिवाय आणि काही*
*कोण मागतो काय याजला हिशेब उरला नाही*
*एक मागतो माणुसकी मी पुरे एवढी भिक्षा*
*रूद्र येतसे मागून माझ्या घ्याया सत्त्वपरीक्षा*

आपल्या कामाची, आचारविचारांची परीक्षा इथेच होते. म्हणून – देवाच्या काठीला आवाज नसतो ही जाणीव ठेवून वागण्याची बुद्धी व माणुसकीची जपणूक ही हवी. आपल्याला प्रकाश केव्हा पेरता येईल? जेव्हा आपल्याजवळ प्रकाश असेल तेव्हा. म्हणून आपली प्रार्थना अशी असावी, 'Shine on me Father that may reflect your light.'

मध्यंतरी नोबेल पारितोषिक देणाऱ्या समितीच्या प्रमुखाने आम्ही गांधीजींना शांततेसाठी नोबेल पारितोषिक दिले नाही ही चूक झाल्याचे कबूल केले. परंतु ज्यांना हे पारितोषिक मिळाले त्या सर्व विश्ववंद्य सज्जनांनी गांधीजी हे त्यांचे स्फूर्तिस्थान होते हे कबूल केल्याने गांधींचे स्थान अधिक स्पष्ट होते. त्या महात्म्यांनी सांगितलेल्या सात दुष्कृत्यांपासून सर्व जग कायमचे दूर राहिले तर वर्तमानातली आपली प्रार्थना जग खऱ्या अर्थाने माणसाला राहण्यायोग्य करील यात शंका नाही. ही सात दुष्कृत्ये अशी– १. नीतीविना व्यापार, २. विवेकाविना सुखोपभोग, ३. तत्त्वाविना राजकारण, ४. चारित्र्यविना ज्ञान, ५. मानवतेविना विज्ञान, ६. परिश्रमाविना संपत्ती, ७. त्यागाविना आराधना.

आजच्या जगातल्या भयंकर परिस्थितीला कारणीभूत असणाऱ्या दहशतवाद, भ्रष्टाचार, धर्मांधता, सत्तांधता इत्यादी दुष्कृत्यांची बीजे ह्या यादीत सापडतील. कपडे बदलावे तसे पक्ष बदलायचे, भाजी चिरावी तशी माणसे चिरायची, जात नाही ती जात म्हणून निवडणुकीत जातीचे कार्ड वापरायचे, असे अनेक उद्योग करायचे आणि वर पुन्हा नोटेपासून भिंतीपर्यंत गांधींना साक्षीला ठेवायचे यासारखा दंभ नाही. तो दूर होवो, निदान त्या दिशेने जगू इच्छिणाऱ्यांना जगता यावे.

ज्ञानेश्वरांपासून तुकाराम–रामदासां–पर्यंतचे काही संत यांचा विचार यासंदर्भात जाणून घेतला. आधुनिक म्हणजे विसाव्या शतकातली काही प्रातिनिधिक कवींचा विचार समजून घेतला. आता महत्त्वाचा विचार म्हणजे प्रत्यक्षात ते आर्थिक, वैज्ञानिक, शास्त्रीय क्षेत्रात काम करतात, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करून सोयीसुविधा पुरवून माणसाचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतात त्यांचा काय विचार आहे ते बघणे प्रस्तुत ठरेल.

इन्फोसिसचे संस्थापक–अध्यक्ष एन.आर. मूर्ती म्हणतात, ''आपण फार

बोलघेवडे आहोत. चर्चा केली की प्रश्न सुटला असे मानून थिअरॉटिकली सॅटिस्फाईड राहतो. वस्तुत: आजवरच्या प्रगतीचा लाभ ज्यांना झाला त्या प्रत्येकावर मागे राहिलेल्यांना हात देण्याची नैतिक जबाबदारी आहे असे मी मानतो.''

आनंद महिंद्रासारखे करोडपती म्हणतात, ''कशासाठी, कशाची, काय किंमत मोजायची?'' प्रदूषण, अनारोग्य, अस्वच्छता आणि या सगळ्यांनी घेरलेले, गुदमरलेले आयुष्य नशिबी येणार असेल तर आर्थिक-औद्योगिक प्रगतीचे चित्र आतून पोखरले जाईल. संगणक हे मोठे वरदान. पण संगणकीय गुन्हेगारी व अतिवापराचे परिणाम आहेतच. डॉ. रघुनाथ माशेलकर दर्जेदार मनुष्यबळाची उत्पादनक्षमतेशी जोड देण्यावर भर देतात तर चिन्मय बोरकर 'आयटी संलग्न क्षेत्रात सध्या लग्न टिकणे ही समस्या प्रकर्षाने जाणवू लागली आहे' असे सांगून सामाजिक संकटाची बोट उंचावून जाणीव करून देतात. घरकोंबडीसारखी वेबकोंबडी पिढी निर्माण होण्याचा धोका आहेच. या प्रातिनिधिक प्रतिक्रियांच्या अनुषंगाने बरेच काही स्पष्ट करण्यासारखे आहे. नव्या पसायदानात आम्हाला आम्ही प्रगतीच्या वाटेवर जात असतानाच त्या प्रगतीच्या किमतीच्या स्वरूपात आम्ही सर्वस्व गमावून बसत नाही ना हे कळण्याची, ते तारतम्य लक्षात येण्याची बुद्धी मिळो आजच्या पसायदानातले महत्त्वाचे कलम.

आज ही ज्या ठिकाणी हंडाभर पाण्यासाठी गरम वाळू तुडवत दोन-तीन किलोमीटरची पायपीट करावी लागते तिथे दाराशी पाणी आणण्याची मागणी निश्चितच स्वाभाविक आहे. अशी तपशीलात जाऊन खूप मोठी यादी देता येईल. प्रापंचिक मागणीपासून रामराज्य व्हावे या राजकीय मागणीपर्यंत. वस्तुत: कोणतेही पसायदान हे एक स्वप्न असते. पण त्या स्वप्नात चिरंतन सत्य असते म्हणूनच अशा स्वप्नांची सहजी घसरू शकणाऱ्या माणसाच्या जातीला फार आवश्यकता असते. कारण माणसाच्या ऱ्हासाची गती सत्कर्माकडे जाण्याच्या गतीपेक्षा खूप अधिक असते. असा ऱ्हास झालेला माणूस हा माणूस राहत नाही. अनेकांतला एक नंबर होतो, एक मार्केटमधला उपभोक्ता होतो, एक निव्वळ मतदार होतो. त्याला माणूस म्हणून जगवायचे असेल तर अशा पसायदानात्मक स्वप्नाची गरज आहे. ज्ञानेशाच्या पसायदानापासून, संत महात्म्यांच्या अक्षरापासून ते आजच्या विचारवंत शास्त्रज्ञ, तंत्रज्ञापर्यंत ज्यांनी मनुष्यधर्म वाढवणारे-जागवणारे अक्षरधन निर्माण केले त्या अक्षरधर्माचे स्मरण करणे व आपल्या छोट्या वर्तुळात आपल्या क्षमतेनुसार एक पणती लावणे हे खरे पसायदान होय. घनांधकार दाटत आहे, दाटणार आहे. परंतु जोपर्यंत असे स्वप्न पाहणारा जनश्रेष्ठ जन्माला येण्यावर आपला विश्वास आहे तोपर्यंत स्तंभावरच्या दूर मनोऱ्यात तेजस्वी शांत प्रकाश दिसत राहील. पुनश्च कविवर्य कुसुमाग्रजांना वाट पुसत म्हणुया

सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमिरातूनी तेजाकडे प्रभू आमुच्या ने जीवना

---

**- प्रा. वि.ह. क्षीरसागर**
मोगरा बंगला ३४, रामनगर,
वनवैभवजवळ, नाशिक - ४२२००९
दूरध्वनी - २३९६२५९



मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये
घरपोच ११० रुपये

# डॉ. अरुण लिमये

## आठवणींचा कॅलिडोस्कोप

अरुण हुशार विद्यार्थी होता. त्याने फर्स्ट क्लास मिळवून कोणत्या तरी विषयाचा स्पेशालिस्ट व्हावे असे त्याच्या प्राध्यापकांना वाटे. मी अरुणशी याबाबत बोललो तेव्हा तो म्हणाला, 'जयप्रकाश नारायण अमेरिकेमध्ये इंजिनीयरिंगच्या अभ्यासासाठी गेले, परंतु पुढे त्यांना सोशल इंजिनीयरिंग अधिक महत्त्वाचे वाटू लागले. मला स्पेशालिस्ट होऊन मूठभर श्रीमंत पेशंटवर उपचार करण्यात रस नाही. आपल्या समाजातील सर्वसामान्य माणसाचा डॉक्टर होणेच मला अधिक आवडेल'. - ग.प्र. प्रधान

वितरण
ग्रंथाली

# अभिजात लोकहितवादी साहित्याच्या (अलोसाच्या) अभ्यासक्रमाचे महत्व व उद्देश

डॉ. विजय जोशी

**प्रास्ताविक**

माझ्या चाळीस वर्षांच्या अमेरिकेतील वास्तव्यात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की प्रत्येक सामान्य व व्यावसायिक अमेरिकन व्यक्तीला ह्युमॅनिटीज ह्या व्यापक विषयाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या अभिजात पाश्चात्त्य साहित्याची सखोल नसली तरी काही प्रमाणात अभ्यासपूर्ण ओळख असते. अशी ओळख असण्याचे कारण हे, की उच्च शालेय व प्राथमिक महाविद्यालयीन विद्यार्थिदशेत प्रत्येक अमेरिकन व्यक्तीला अभिजात पाश्चात्त्य साहित्यामधील काही भाग असलेला मर्यादित अभ्यासक्रम घ्यावा लागतो. हा अभ्यासक्रम सुरुवातीच्या विद्यार्थिदशेत समाविष्ट करण्याचे कारण हे की अभिजात लोकहितवादी साहित्यामधील निवडलेल्या ग्रंथांच्या अभ्यासपूर्ण वाचनाने मनुष्यस्वभावाची ओळख, मानवी मूल्ये, स्वतंत्रपणे विचार व विश्लेषण करण्याची क्षमता व मानसिक परिपक्वता तरुण वयात रुजवली जाते. पाश्चात्त्यधर्तीचा परंतु संस्कृत व मराठी अभिजात लोकहितवादी साहित्याचा अभ्यासक्रमवर उल्लेखिलेले उद्देश साधण्यासाठी मराठी भाषिकांसाठी योजावा असा विचार माझ्या मनात आला. तो विचार थोड्याबहुत विस्ताराने मराठी बांधवांपर्यंत पोचवण्यासाठी अभिजात साहित्याच्या आटोपशीर परंतु पद्धतशीर अशा अभ्यासक्रमाचे उद्देश, वर उल्लेखलेल्या इष्ट परिणामांखेरीज इतर बाबतीतील महत्त्व, अमेरिकेतील अभ्यासक्रमाची थोडक्यात ओळख व मराठी बांधवांकरता अशा अभ्यासक्रमाची प्राथमिक ढोबळ रूपरेषा असलेला लेख सादर करत आहे.

**ह्या लेखातील मुख्य संज्ञांच्या व्याख्या**

अभिजात : उच्च प्रतीचे, परंपरेने मान्यता पावलेले, कालातीत, चांगले, नैतिक व व्यावहारिक, वैयक्तिक व सार्वजनिक हिताला पोषक ठरणारे जीवन जगण्यास उद्युक्त करणारे उदात्त (साहित्य).

लोकहितवादी : स्वत: शिक्षण घेणारी व्यक्ती व समाजातील इतर सर्व व्यक्ती ह्यांचे बौद्धिक, ऐहिक व वैचारिक हित साधणारे (साहित्य).

साहित्य : ललित व वैचारिक, संस्कृत व मराठी प्राचीन व अर्वाचीन वाङ्मय व इतिहास. ह्यापुढे ह्या लेखात अभिजात लोकहितवादी साहित्य ह्यांचा अलोसा ह्या संक्षिप्त शब्दाने उल्लेख केला आहे.

ह्युमॅनिटीज : ह्या इंग्रजी संज्ञेची ह्या लेखाच्या दृष्टिकोनातून मर्यादित व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल – मानवाच्या (निधर्मी) गुणावगुणांचे वर्णन व विश्लेषण आणि मानवी मूल्यांचे वर्णन असलेले पाश्चात्त्य अलोसा. ह्या वाङ्मयात ललित व वैचारिक साहित्याखेरीज इतिहास, तत्त्वज्ञान व नीतिमत्ता ह्या विषयांवरील अलोसाचा समावेश होतो. ह्युमॅनिटीजच्या अधिक व्यापक व्याख्येमध्ये फाइन आर्ट्स म्हणजे चित्रकला, मूर्तिकला व संगीत ह्यांचा अलोसाबरोबर समावेश होतो. ह्युमॅनिटीजच्या अमेरिकेतील अभ्यासक्रमात ह्या कलांमधील कौशल्य रुजवण्याचा उद्देश नसून ह्या कलांसंबंधीचे मूलभूत ज्ञान व त्यांचा आस्वाद घेण्याचे, अभ्यासात्मक रसग्रहण करण्याचे शिक्षण देण्याचा असतो. ह्याहूनही अधिक व्यापक व्याख्यांमध्ये विविध धर्मांचा तुलनात्मक अभ्यास किंवा एखाद्या धर्माच्या मूलभूत ग्रंथांचा अभ्यास व व्यावसायिक शिक्षणाबाहेरील नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास ह्या सर्वांचा ह्युमॅनिटीजमध्ये समावेश करण्यात येतो. ह्या व्यापक व्याख्येमधील विषयांना लिबरल आर्ट्स ह्या संज्ञेने पण संबोधण्यात येते.

वर उल्लेखलेल्या सर्व व्याख्यांमधील अभिजात ललित व वैचारिक साहित्य व इतिहास, नीतिमत्ता आणि तत्त्वज्ञान ह्या विषयांवरील अभिजात साहित्य ही ह्युमॅनिटीजची मर्यादित व्याख्या ह्या लेखात अवलंबली आहे. पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये प्रारंभी ह्या मर्यादित व्याख्येत केवळ प्राचीन ग्रीक व रोमन अभिजात साहित्याचा समावेश करण्यात आला होता– परंतु कालांतराने त्यात इतर युरोपीय भाषांमधील अर्वाचीन अभिजात साहित्याची भर घालण्यात आली. साहित्याचा अभ्यास म्हणजे ज्या भाषेत ते साहित्य असते त्या भाषेचा व भाषाशास्त्राचा अभ्यास ओघाने आलाच. परंतु सर्वसामान्यांकरता आखलेल्या अभ्यासक्रमात स्थानिक भाषेतील (उदा. इंग्रजी) अनुवादित संक्षिप्त ग्रंथ समाविष्ट करण्यात येतात. ह्या सर्व वाङ्मयामधील ग्रंथांची निवडक उदाहरणे अमेरिकेतील अलोसाच्या व मराठी बांधवांकरता मी सूचित केलेल्या अलोसाच्या अभ्यासक्रमाच्या ढोबळ रूपरेषेत पुढे देत आहे.

**अमेरिकेतील अलोसाच्या अभ्यासक्रमाची ढोबळ रूपरेषा**

मराठी बांधवांकरता अलोसाच्या अभ्यासक्रमाची आखणी करण्याकरता ही रूपरेषा मार्गदर्शक ठरेल. अलोसाची पुढील उदाहरणे प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. १. प्राचीन गीक व रोमन महाकाव्ये : इलिअल, ऑडिसी व इनिड; २. प्राचीन ग्रीक नाटके : ऑरॅस्टिआ; ३. प्राचीन ग्रीक व रोमन इतिहास : हिस्टरी ऑफ पर्शिअन वॉर, हिस्टरीज ऑफ रोमन एम्परर्स; ४. वैचारिक व तत्त्वज्ञानातील ग्रंथ : प्लेटोचे रिपब्लिक, ॲरिस्टॉटलचे ट्रिटीजेस ऑन लॉजिक, जॉन लॉकचे ट्रीटीज ऑफ गव्हर्नमेंट; ५. ललित साहित्य : शेक्सपियरचे किंग लिअर, हॅम्लेट, जेन ऑस्टेनचे प्राइड अँड प्रिज्युडिस इत्यादी. ही यादी लांब वाटत असली तरी उच्च शालेय व प्राथमिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरता आखलेल्या अभ्यासक्रमात ह्यातील एखाददुसऱ्या निवडक ग्रंथाची अथवा त्यामधील उचित महत्त्वाच्या भागाची, इंग्रजी अनुवादित आवृत्ती अवलंबली जाते. या यादीमधील महाकाव्यांचे व ललित वाङ्‌मयाचे वाचन केवळ मनोरंजक कथानक म्हणून करायचे नसून त्या वाङ्‌मयातील मनुष्यस्वभावाच्या विभिन्न छटा, तत्त्वे, ऐहिकता व व्यक्तिविकासाचे महत्त्व इत्यादी अभ्यासण्याच्या दृष्टिकोनातून करायचे असते. ह्या ग्रंथांचा अभ्यास कशा पद्धतीने करतात ह्याची कल्पना यावी म्हणून ह्या यादीमधील काही उदाहरणांसंबंधी काहीशा विस्ताराने लिहितो.

१. इलिअड हे ग्रीक पौराणिक कथेवर आधारित असलेले महाकाव्य होमर ह्या ग्रीक कवीने इ.स.पूर्व सातव्या शतकात लिहिले. ह्या महाकाव्याला पाश्चात्त्य अभिजात साहित्यामध्ये उच्च स्थान आहे. इलिअडमध्ये ट्रॉय ह्या प्राचीन शहराला (उत्खननाच्या आधारे हे शहर सध्याच्या तुर्कस्थानमध्ये असल्याचे दाखवण्यात आले आहे) ग्रीक सैन्याने इ.स.पूर्वी बाराव्या शतकात घातलेल्या नऊ वर्षांच्या वेढ्याच्या शेवटच्या चाळीस दिवसांमधील रोमहर्षक व उद्‌बोधक घटनांचे वर्णन आहे. वेढा घालण्याचे कारण हे की ट्रॉयच्या पॅरिस ह्या एका राजपुत्राने ग्रीसमधील एक राणी हेलनचे अपहरण केले होते. हेलन स्वेच्छेने पॅरिसबरोबर गेली अशी पण वदंता होती, वेढा काढून घेतल्याचा आभास निर्माण करून ग्रीक सैनिकांनी एका प्रचंड लाकडी घोड्यात लपून ट्रॉयमध्ये प्रवेश मिळवला व ट्रॉयचा नेता हेक्टर याचा वध करून हेलनची सुटका केली. ह्या कथानकाचे रामायणातील सीतेच्या अपहरणाशी व लंकेशी रामाने केलेल्या युद्धाशी काहीसे साम्य आहे हे सूज्ञ वाचकांच्या लक्षात येईल. ह्या वेढ्याच्या कालखंडात अनेक वीरांचा वध झाला. ग्रीक पुराणातील विविध देव व देवता दोन्ही युद्धपक्षांना साहाय्य करत होत्या. अकिलीस व ॲगमेम्नन ह्या ग्रीक सेनापतींमधील व इतर शूर योद्धे ह्यांच्यामधील वैयक्तिक स्पर्धा, संघर्ष, द्वेष, लबाडी, त्यांचे एकमेकांबद्दल प्रेम, शौर्य इत्यादी गुणावगुण व मानवी जीवनासंबंधी विविध दृष्टिकोन, व्यक्तींचे समाजातील स्थान, स्त्रियांची प्रतिष्ठा व त्यांचे महत्त्व, योद्ध्यांची स्वत:ची जीवनमूल्ये ह्यांचे होमरने कुशलतेने वर्णन केले आहे. अकिलीस ह्या इलिअडचा नायक असलेल्या ग्रीक सेनापतीच्या प्रौढी, गर्व, तामसी स्वभाव व काहीही करून स्वत:ची प्रतिमा न झाकांळून देण्याचे पराकोटीचे प्रयत्न ह्यामुळे इतरांच्या जीवनात कशी संकटे निर्माण होतात ह्याचे चित्रण होमरने परिणामकरीत्या केले आहे. विविध देव व देवतासुद्धा एका किंवा दुसऱ्या युद्धपक्षाला साहाय्य करताना काही वेळा कसे अन्याय्य व अयोग्य वर्तन करतात ह्याचेपण उद्‌बोधक वर्णन इलिअडमध्ये आहे. ह्या सर्व मानवी व्यक्ती व देवदेवता ह्यांच्या स्वभावाच्या व वर्तनाच्या विविध पैलूंमुळे इलिअड हे केवळ मनोरंजक कथानक म्हणून नव्हे तर चारित्र्यघडण, युद्धातील डावपेच, जीवनातील पेचप्रसंगातून मार्ग काढण्याची कुशलता, व्यावहारीक ज्ञान अशा विविधांगी दृष्टिकोनातून श्रेष्ठ मानले जाते व ह्या सर्व दृष्टिकोनातून अभ्यासले जाते.

अभ्यासक्रम चालू असताना विद्यार्थ्यांना ह्यासंबंधी प्रश्न विचारले जातात व एखाद्या व्यक्तीवर किंवा घटनेवर स्वत: विचार करून व विश्लेषण करून निबंध लिहावा लागतो. विद्यार्थ्यांना विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील : पॅरिस व हेलन ह्यांच्यात एकमेकांशी असलेल्या नात्यासंबंधी तुमचे काय मत आहे? ग्रीक योद्धे स्वातंत्र्य ह्या कल्पनेची कदर करतात का? त्यांची स्वातंत्र्यासंबंधी काय कल्पना होती? इलिअडमधील देवदेवतांचे वर्तन तुम्हाला अपेक्षित होते का?

सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल ह्यांच्या ग्रंथांमधील तत्त्वज्ञानाची उदाहरणे म्हणून पुढील उद्‌बोधक शिकवणींवर अभ्यासक्रमात भर देण्यात येतो – निरीच्छता न बाळगता किंवा इच्छांवर दडपण न आणता योग्य उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करून सर्व इच्छांचे समन्वय व संघटन करावे; तर्कशुद्ध विचारसरणी विकसित करावी व जीवनाची वाटचाल सकारात्मक प्रवृत्ती व कार्यशीलता ह्यांच्याकडे वळवावी. केवळ स्वत:चे जीवन जगायचे एवढेच नव्हे तर समाजाच्या व राष्ट्राच्या प्रगतीकरता प्रयत्नशील राहावे; जीवनात धैर्य, न्याय, सौजन्य, सुज्ञता, संयम व पावित्र्य ह्या तत्त्वांचा समावेश करावा.

**अलोसाच्या अभ्यासाचे महत्त्व**

आर्थिक सुबत्तेला सांप्रतच्या काळात खीळ बसल्यामुळे व अर्थव्यवस्था तंत्रज्ञानावर अधिकाधिक अवलंबून असल्यामुळे आजच्या गुंतागुंतीच्या जगात अलोसाच्या अभ्यासाचे महत्त्व व आवश्यकता ह्यासंबंधी सध्या अमेरिकेतसुद्धा शंका प्रदर्शित केल्या जातात – मग महाराष्ट्रात अशा प्रकारचा नवीन धाटणीचा अभ्यासक्रम शिक्षणात समाविष्ट करण्याला विरोध होणे मला अपेक्षित आहे. आजच्या जगात शास्त्रज्ञ, अभियंते, तंत्रज्ञ, वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञ ह्यांची आवश्यकता प्रथम आहे असे मत तंत्रज्ञानावर आधारित असलेले औद्योगिक नेते व त्या क्षेत्रातील संशोधक मांडतात. त्याउलट समाजशास्त्रज्ञ

व शिक्षणशास्त्रज्ञांचे मत असे आहे. की लोभ, हाव ह्यांचा अतिरेक, नैतिकता व सचोटी ह्यांचा अभाव व पराकोटीचा स्वार्थ ह्यांच्यामुळे आजचे आर्थिक संकट कोसळले असल्यामुळे त्यातून तरणारी नवीन पिढी जोपासण्याकरता अलोसाच्या शिक्षणाची अधिकच प्रकर्षाने आवश्यकता निर्माण झाली आहे.

सुसंस्कृततेने जीवन कसे जगायचे आणि नैतिक पेच (ethical dilemma) (उदा. मातेच्या इच्छेकरता गर्भपात करण्यात गर्भाचा जीवन जगण्याचा मूलभूत हक्क पायदळी तुडवला जातो का?) पडला तर योग्य निर्णय कसा घ्यायचा व नैतिक प्रमाद घडला तर क्षमाशीलता दाखवून त्यातून मार्ग कसा काढायचा ते अलोसाचे शिक्षण शिकवते. जीवनाचा मूलभूत अर्थ व उद्दिष्ट ह्यांचा शोध घेण्याचा किंवा त्यासंबंधी निर्णय घेण्याचा मक्ता उद्योगपतींच्या हाती देण्याइतकी शिक्षण ही क्षुल्लक गोष्ट नाही. नैतिकता, सचोटी, संकटे टाळण्याचे व वेळ आलीच तर संकटांना तोंड देऊन त्यातून मार्ग काढण्याचे बौद्धिक व मानसिक सामर्थ्य व व्यावहारिक कुशलता मिळवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना, ते नंतर कोणतेही व्यावसायिक (उदा. वैद्यकीय, अभियांत्रिकी, स्थापत्यकला इत्यादी) शिक्षण घेणार असले तरी, अलोसाच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. ह्या संदर्भात पुढील उदाहरण उद्‌बोधक ठरेल.

अमेरिकेतील काही वैद्यकीय शिक्षणसंस्थांमध्ये पदव्युत्तर विशेष वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांसाठी अलोसाच्या अभ्यासक्रमाचा उजळणी-अभ्यासक्रम म्हणून समावेश करण्यात आला आहे. अशा उजळणीमुळे वैद्यकीय कुशलतेमध्ये व आजारांनी ग्रस्त झालेल्यांना व्यापक (holistic) व सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोन उपचार करताना रुजेल असे वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

**अलोसाच्या अभ्यासाचे उद्दिष्ट**

अलोसाचे मूलभूत व 'पवित्र' उद्दिष्ट म्हणजे मानव व मानवता ह्यांचा शोध घेण्याकरता अभ्यासाची साधने पुरवणे व त्यायोगे असा शोध घेण्याची ईर्षा रुजवणारी मानसिकता बिंबवणे. अलोसाच्या शिक्षणामुळे व्यक्तिगत बौद्धिक विकास होतो. असे शिक्षण आणि शास्त्रांचे व व्यावसायिक शिक्षण एकमेकांना पूरक ठरतात, कारण अलोसाच्या अभ्यासामुळे कोणत्याही विषयाची जाण येणे व विषयाचे विश्लेषण करण्याची क्षमता येणे अधिक सुलभ होते. अलोसाच्या शिक्षकांनी त्यातील घटना, विचार, मनुष्यस्वभावाचे विविध पैलू ह्या सर्वांचा व्यावहारिक व व्यावसायिक क्षेत्रांमधील उपयुक्ततेवर भर द्यायला हवा. हार्वर्ड विद्यापीठाचे माजी कुलगुरू बोक म्हणतात : ''अलोसाचे शिक्षण व्यावसायिक शिक्षणाकरता उपयोगी असणारी विचारक्षमता व मानसिकता बिंबवते. अलोसाच्या अभ्यासामुळे विश्लेषणाचे व विचारपद्धतशीरपणे मांडण्याचे कौशल्य व जीवनातील व व्यवसायातील नैतिक प्रश्नांची समज येणेदेखील साधते. उपलब्ध असलेल्या पुराव्याचे पृथक्करण, त्यातील योग्य गोष्टींची निवड व त्यावर आधारित विवेचन व कारणमीमांसा ह्याकरता लागणारे कौशल्य अलोसाचे शिक्षण वृद्धिंगत करते.'' वरील सर्व गोष्टी उद्योजक, धंदेवाईक ह्यांच्याकरता व वैद्यकीय, राजकारण, कायदेशास्त्र व पत्रकारिता ह्या सर्व क्षेत्रांमध्ये उपयुक्त ठरतात. अलोसाचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमात विशेष यश संपादन करतात असा अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांचा अनुभव आहे. व्यावसायिक कौशल्य संपादन करण्यासाठी जी चिकाटी व खोल तपशीलात शिरण्याची क्षमता लागते ती अलोसाच्या अभ्यासक्रमातील ग्रंथांच्या तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ व परिश्रमपूर्वक विश्लेषणाने प्राप्त होते. अलोसाच्या अभ्यासामुळे जीवनात आवश्यक असलेली सम्यक विचार व समीक्षा करण्याची क्षमता वृद्धिंगत होते. मानवी जीवनाशी संबंधित प्रत्येक विषयासंबंधी समर्पक प्रश्न विचारणे, त्यांना देण्यात येणारी अयोग्य व अनुचित उत्तरे नाकारून उचित व समर्थनीय


ज्ञानदा

दोन ताजी प्रकाशने



आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते

यशवंतराव पंडितराव

मूल्य १०० रुपये : सवलतीत ६० रुपये



बालकल्याण ते बालकहक्क

माधुरी भिडे

मूल्य ५० रुपये : सवलतीत ३० रुपये

(defensible) उत्तरांची व पर्यायांची निवड करण्याची क्षमता ह्यांची रुजवात होते. सामाजिक सुव्यवस्था व आर्थिक सुबत्ता प्रस्थापित करण्याकरता अशा क्षमतेला नैतिकता व संयम ह्यांची जोड असावी लागते.

वर उल्लेखलेल्या व्यावहारिक उपयुक्ततेशिवाय अलोसाचे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये बिंबवते आणि अभिलाषा व बेजबाबदारी ह्यामुळे व सचोटीच्या अभावामुळे घडणारे परिणाम टाळू शकते. इथे हे नमूद करणे आवश्यक आहे की अलोसाचे शिक्षण व त्याकरता लागणारे वाचन व अभ्यास केवळ विद्याषर्थिदशेत अभ्यासक्रमात समावेश करून नीट साधता येतात. अशा अलोसाच्या अभ्यासावर आधारलेल्या नैतिकमूल्यांची पुन: पुन्हा नंतरच्या कौटुंबिक व व्यावसायिक जीवनात आवश्यकता असतेच - परंतु ह्या मूल्यांची महत्त्वाची जाणीव व संवेदनशीलता विद्यार्थिदशेतील तरुण मनात रुजवणे आवश्यक आहे. समाजसुधारणेसंबंधीच्या विचार-मंथनासाठी, मूलभूत मानवीहक्कांची जाणीव व संवेदनशीलता रुजवण्यासाठी व अत्या-भिलाषा, लबाडी व भ्रष्टाचार रोखण्यासाठी अलोसाचे शिक्षण मार्गदर्शन करू शकते.

अमेरिकेच्या संदर्भात हे नमूद करावेसे वाटते की अमेरिकेतील राष्ट्रीय अलोसा प्रतिष्ठान (National Endowment for Humanities) तेथील केंद्रीय शासनाची एक स्वतंत्र शाखा आहे व प्रेसिडेंट ओबामा अलोसाच्या शिक्षणाचे पुरस्कर्ते आहेत. २००९च्या अंदाजपत्रकात व आर्थिक उत्तेजन योजनेमध्ये (stimulus package) अलोसा प्रतिष्ठान व कलाविकासासाठी खास रक्कम देऊ केली आहे. अलोसाचे शिक्षण घेतलेले प्रेसिडेंट ओबामा अशा शिक्षणाने उदारमतवादी मानसिकता कशी रुजते व काय मिळते ह्याचे प्रत्यक्ष मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांनी विद्यार्थिदशेत व नंतर केलेल्या वाचनात प्राचीन ग्रीक व रोमन साहित्याचा व अर्वाचीन पाश्चात्त्य साहित्याचा (उदा. शेक्सपियरची निवडक नाटके, जर्मन तत्त्वज्ञ मिची व ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ ह्यांचे ग्रंथ इत्यादी) समावेश आहे.

अभिजात संस्कृत व मराठी साहित्याचे निवडक भाग सर्व मराठी (महाराष्ट्रीय) उच्च शालेय व प्राथमिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचले व अभ्यासले तर वर उल्लेखिलेल्या गुणांची तारुण्यापासून रुजवात होईल व तारुण्यातील व नंतरच्या जीवनातील दुर्गुणांचा प्रादुर्भाव रोखला जाईल. महाराष्ट्रातील सर्व जाती, धर्म व विविध भौगोलिक भाग ह्यांच्यातील मराठी बांधवांच्या विचारसरणीत एक समान धागा, समान उदात्त उद्दिष्टांची जाणीव व एकमेकांबद्दल आत्मीयता निर्माण होईल. सामाजिक समस्यांमधील प्रत्येकाच्या जबाबदारीची जाणीव होईल. महाराष्ट्राच्या इतिहासातील दुर्घटना, अभिमानास्पद घटना व विविध ऐतिहासिक व्यक्ती ह्यांच्याबद्दल सर्व मराठी बांधवांना आपल्या पार्श्वभूमीत काहीतरी समान धागा व जबाबदारी आहे ह्याचीदेखील जाणीव होईल. अलोसाचा अभ्यास व कलोपासना केली नाही तर माणसे जीवनाच्या खऱ्या अर्थाला व आनंदाला मुकतील व यंत्रासारखे किंवा रोबॉट (robot) सारखे काम करू लागतील. सर्वसामान्य व्यक्तींमद्ये विचारक्षमता, संवेदनशीलता, दूरदृष्टी व सर्जनशीलता रुजवण्यास अलोसाचा अभ्यासक्रम एक उत्तम मार्ग आहे. अलोसाचे शिक्षण सुहास गो. तपस्वी ह्यांनी मांडलेल्या शास्त्रोक्त व औपचारिक समाजशिक्षणाच्या कल्पनेचा एक अविभाज्य भाग ठरेल असे मला वाटते. त्याकरता माझ्या मर्यादित अनुभव व ज्ञान ह्यांच्यावर आधारीत असलेल्या अलोसाच्या भावी अभ्यासक्रमाची ढोबळ रूपरेषा सादर करत आहे.

**मराठी बांधवांकरता अलोसाच्या अभ्यासक्रमाची ढोबळ रूपरेषा**

मी ह्या विषयातील अनुभवी किंवा तज्ज्ञ नाही. मी निवडक ललित व वैचारिक मराठी साहित्य व संस्कृत साहित्याचे मराठी किंवा इंग्रजी अनुवाद व त्यावरील टीकात्मक ग्रंथ वाचले आहेत व वाचतो आहे. अशा मर्यादित अनुभवावर आधारलेली पुढील ढोबळ रूपरेषा विनम्र सादर करत आहे. त्यात तज्ज्ञांनी बदल व काटछाट केली तर मला खेद नाही. पुढे उल्लेखिलेल्या संस्कृत ग्रंथांचे टीपासहित संक्षिप्त मराठी अनुवाद अलोसाच्या अभ्यासक्रमासाठी तयार करावेत असे मी सुचवू इच्छितो. त्याचप्रमाणे मराठी ग्रंथांचे काही महत्त्वाचे भाग समाविष्ट करून संक्षिप्त व टीपा असलेली पुस्तके तयार करावीत. सबंध संस्कृत किंवा मराठी ग्रंथ नव्हे तर त्यांचे वरील उद्दिष्टे साधण्याच्या दृष्टिकोनातून योग्य असे भाग समाविष्ट केलेल्या संक्षिप्त मराठी आवृत्ती तयार करणे आवश्यक ठरेल. यादीमधील प्रत्येक ग्रंथ नव्हे तर शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार काही निवडक ग्रंथ अभ्यासक्रम आटोपशीर ठेवायच्या दृष्टीने समाविष्ट करावेत. अलोसामधील ग्रंथांची उदाहरणे देत आहे. अमेरिकन अलोसाचा आराखडा त्यासाठी अनुसरला आहे. १. संस्कृत ग्रंथ किंवा त्यांचे महत्त्वाचे भाग : ऋग्वेद, गीता, रामायण, महाभारत, चाणक्यनीती, कादंबरी, शाकुंतल, मृच्छकटिक (ह्यातील एक किंवा दोन ग्रंथच निवडणे व्यावहारिक दृष्ट्या योग्य ठरेल); २. मराठी ग्रंथ किंवा त्यांचे महत्त्वाचे भाग : ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, मोरोपंतांची केकावली, राजवाडे ह्यांनी लिहिलेला मराठ्यांचा इतिहास, लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य, लोकहितवादी देशमुखांची शतपत्रे, महात्मा फुले ह्यांचे सार्वजनिक सत्यधर्म, विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला, ह.ना. आपटे ह्यांची 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी, दलित साहित्य (उदा. लक्ष्मण माने ह्यांचे उपरा, डॉ. नरेंद्र जाधव ह्यांचे आमचा बाप अन् आम्ही इत्यादी), वसंत कानेटकर ह्यांचे हिमालयाची सावली, पु.ल. देशपांडे यांचे तुझे आहे तुजपाशी, बहिणाबाई चौधरी ह्यांचा काव्यसंग्रह, कुसुमाग्रजांचा रसयात्रा हा काव्यसंग्रह, मराठी सोडून एखाद्या इतर भारतीय

भाषेतील काव्यसंग्रहाचे मराठी भाषांतर.

हे सर्व ग्रंथ केवळ कथानक, धार्मिकता, अध्यात्म, मनोरंजन, शब्दांची किमया व भावनाशीलता ह्या दृष्टिकोनातून न वाचता त्यातील निधर्मी तत्त्वे, शिकवणी, नीतिमत्ता, व्यक्तित्वाचे विविध पैलू, ऐहिकतेचे महत्त्व, सामाजिक समस्या ह्यांची जाण होण्याकरता हे साहित्य अभ्यासणे अशी भूमिका शिक्षकांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी घ्यायला हवी.

कोणत्याही भरीव वाचनाचे तीन टप्पे असतात : १. ग्रंथामधील विचार, घटना, व्यक्तिदर्शन, व्यक्तींनी घेतलेले निर्णय (उदाहरणार्थ, महर्षी कर्व्यांसारख्या सामाजिक सुधारणेला वाहून घेतलेल्या व्यक्तीने घेतलेले कठोर कौटुंबिक निर्णय मांडणारे हिमालयाची सावली हे नाटक) ह्यांचे एकाग्रतेने वाचन, नंतर २. वाचलेल्या मुद्यांचे स्वत: नीटपणे व सम्यकतेने केलेले विचारमंथन व पृथक्करण आणि ३. ग्रंथातील विविध व्यक्ती, घटना इत्यादींसंबंधी चर्चेच्या आणि किंवा लेखनाच्या स्वरूपात स्वत:च्या मतांची सौजन्यशीलतेने पण स्पष्टपणे व परखडपणे मांडणी.

ह्या ग्रंथांचे शिक्षण देण्याचा उद्देश विद्यार्थ्यांना विशेष व्यवसायाकरता तयार करण्याचा नसून ह्या ग्रंथांच्या अभ्यासाद्वारे तर्कशुद्ध विचारमंथनाची क्षमता, मनुष्य स्वभावाच्या विविध पैलूंची ओळख, इतिहासाचे ज्ञान व विश्लेषणावर आधारित सम्यक वस्तुनिष्ठ टीका करण्याची मानसिकता ह्याची रुजवात करणे हा आहे. सरतेशेवटी ह्या विद्यार्थ्यांनी कोणताही व्यवसाय अंगिकारला तरी सातत्याने व्यक्तिविकास साधणे, लोकशाहीमध्ये सक्रिय भाग घेणे, नागरिकत्वाची तत्त्वे ह्यांचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवले जाते.

काही विद्यार्थी, पालक व शिक्षणतज्ज्ञ असा आक्षेप घेतील की आधीच सध्याच्या शिक्षणातील विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व शिक्षकांना डोईजड झालेले असताना त्यात अलोसाच्या अभ्यासक्रमाची भर घालणे पेलणारे नाही. ह्या आक्षेपामध्ये काही प्रमाणात सत्य असले तरी एका महत्त्वाच्या गोष्टीची जाणीव ठेवायला हवी की वर उल्लेखिलेले गुण व व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास ह्यांचे महत्त्व तरुण वयात बिंबवणे अधिक सुलभ असते व विद्यार्थिदशेतच आखीव अभ्यासक्रमाद्वारे हे शिक्षण देणे शक्य असते. पुढे, प्रौढ वयात कौटुंबिक व व्यावसायिक जीवनाच्या जबाबदाऱ्या स्वीकारल्यानंतर वरील ग्रंथांचे अभ्यासपूर्ण वाचन करणे शक्य होत नाही व त्या ग्रंथांमधील कल्पनांचा प्रभाव आधीच जडणघडण झालेल्या मानसिकतेवर पडू शकत नाही. सर्वसाधारण मराठी वाचक वरील ग्रंथांमधील काही उदाहरणांचे धार्मिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून वाचन किंबहुना पठण किंवा पारायण (recitation) करतो पण त्यांचे नीट अभ्यासपूर्ण वाचन करत नाही. अशा विधानावर कोणी टीका करू शकेल असे वाटत नाही. वरील उल्लेखिलेल्या कोणत्याही ग्रंथाचे विद्यार्थिदशेत व्यापक दृष्टिकोनातून केलेले अभ्यासपूर्ण वाचन पुढील व्यावसायिक शिक्षणातील व जीवनातील आवश्यक असणाऱ्या त्या त्या विषयातील ग्रंथांचे अभ्यासपूर्ण वाचन करण्याची इष्ट सवय,कौशल्य रुजवते व नंतरच्या जीवनातील अभ्यासाची रंगीत तालीम ठरते.

**संस्कृत व मराठी अलोसाच्या निवडक ग्रंथांच्या अभ्यासाची दिशा व उद्देश**

अलोसाच्या अभ्यासक्रमातील ऋग्वेद, रामायण, महाभारत, चाणक्यनीती, तुकारामगाथा, दलित साहित्य व तुझे आहे तुजपाशी ह्यांच्यासंबंधी माझ्या प्राथमिक स्वरूपाच्या निवडक वाचनावर आधारित आमचे स्फूट विचार व इतर काही टीकाकारांचे विचार मांडतो.

१. ऋग्वेद हा होमहवनासाठी तयार केलेल्या मंत्रांचा व प्रार्थनांचा संग्रह असल्याची समजूत व बहुसंख्य मराठी बांधवांच्या मनात असते. परंतु महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी ऋग्वेदाच्या केलेल्या भाषांतरच्या प्रास्ताविकात (प्रकाशक : भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे १९६९) पुढील विचारनीय मुद्दे मांडतात– ''आध्यात्मिक तत्त्वज्ञान सूत्रां-प्रमाणेच राज्यकर्त्यांचे कर्तव्य, लोकमतानुसार विस्तृत स्वराज्य, स्त्रियांचे बौद्धिक कर्तव्य, सृष्टीची उत्पत्ती, आरोग्यप्राप्ती, शेती, युद्धशास्त्र इत्यादी विषयांवर ऋग्वेदात ऋचा आढळतात. ऋग्वेदात ऋषींखेरीज समाजातील सर्व स्तरांमधील पुरुष व स्त्रिया यांच्या ऋचांचा समावेश आहे. समाजकल्याणाची ऋग्वेदप्रणित कल्पना सर्वसामान्य जनांना मानसिक चिरशांती व वैचारिक समाधान देणारी आहे. धर्माच्या चौकटीत मनुष्यमात्राचा विकास होऊन समाज सुस्थिर पायावर उभा रहावा ही एकच तळमळ ऋग्वेदाच्या रचनेमागे दिसते.'' ह्यावरून मला असे वाटते की ऋग्वेद ह्या भारतीय आद्यग्रंथाची नीट व पद्धतशीर ओळख सर्व मराठी बांधवांना करून देणे महत्त्वाचे आहे व ती ओळख करून देताना ऋग्वेद हा समाजोपयोगी तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे व तो ग्रीस किंवा इतर पाश्चात्त्य देशांमधील साहित्यावर आधारित नसून ह्या भारतभूमीतील विचारवंतांनी लिहिलेल ग्रंथ अशी खरीखुरी अस्मितापूर्ण भूमिका ठेवणे ऋग्वेदातील धार्मिकतेइतकेच महत्त्वाचे आहे.

२. रामायणातील मनोरंजक व भक्तिरसपूर्ण कथानकाखेरीज व्यक्तींचा स्वभाव, त्यांचे निर्णय, विविध घटना ह्यासंबंधी विचारमंथन ह्यावर अलोसाच्या अभ्यासक्रमात भर द्यावा असे माझे मत आहे. उदाहरणार्थ, आदर्श व्यक्तित्व असलेल्या रामाने सुग्रीवाची बाजू घेऊन झाडाआड लपून वालीला मारणे किंवा एका धोब्याच्या शब्दावरून सीतेचा त्याग करणे, लक्ष्मणाने उर्मिलेला विरहात ठेवून रामाबरोबर वनवासात जाणे, हनुमानाची रामावरील भक्तीच नव्हे तर संपूर्ण निष्ठा इत्यादींसंबंधी प्रश्न, विवेचन, विश्लेषण, स्वत:च्या मताची लहान निबंधात मांडणी अशा सर्व शिक्षणपद्धतींचा वापर करून रामायणाचे निवडक भाग अलोसाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत.

३. रामायण माणसाने कसे असावे हे

शिकवते व महाभारत माणूस प्रत्यक्षात कसा असतो ह्याचे दर्शन घडवते असे म्हटले जाते. महाभारताच्या अलोसाच्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात वर उल्लेखिलेल्या उद्दिष्टांवर आधारित डॉ. पु.ग. सहस्रबुद्धे ह्यांचा 'महाभारतातील तत्त्वज्ञान, अथवा 'राष्ट्रधर्म' अशा शीर्षकाचा प्रबंध उद्बोधक आहे. ह्या प्रबंधावर आधारित भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म ह्या शीर्षकाची पुस्तिका (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००३) प्रसिद्ध केली आहे. डॉ. पु.ग. सहस्रबुद्धे ही पुस्तिका प्रा. श्री.म. माटे ह्यांना अर्पण करताना म्हणतात– ''आपण मला विचार करण्यास शिकवले.'' सर्व मराठी भाषकांना विचार करायला शिकवणे हा अलोसाच्या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. ह्या पुस्तिकेतील एक विधान उद्धृत करतो– ''महाभारत हा मुख्यत: ऐहिक उत्कर्षाची प्रेरणा देणारा व त्याचे मार्ग दर्शवणारा राष्ट्रीय ग्रंथ आहे. प्रवृत्तीवाचून मोक्ष पंगू आहे असे त्यात स्पष्टपणे सांगितले आहे.'' ह्या विधानांवरून असे स्पष्ट होते, की महाभारताच्या शिकवणींकडे केवळ धार्मिक व आध्यात्मिक दृष्टिकोनांमधून न पाहता इतर व्यावहारिक व व्यापक दृष्टिकोनातून पण पाहिले पाहिजे.

३. चाणक्यनीती (किंवा कौटिल्य अर्थशास्त्र) ह्या इ.स.पूर्व ३२१ ते २९६ ह्या कालखंडात लिहिलेल्या ग्रंथामधील दोन तत्त्वे उदाहरणे म्हणून अलोसाच्या अभ्यास-क्रमाच्या दृष्टिकोनातून उद्धृत करतो– १. मानवाची थोरवी त्याचा जन्म कोणत्या कुळात झाला ह्यावर नव्हे तर त्याच्या कर्तृत्वावर आधारित असते. २. फुलांचा सुगंध केवळ वाऱ्याच्या दिशेने दरवळतो, ह्याउलट मानवी व्यक्तीचा चांगुलपणा सर्व दिशांमध्ये पसरतो.

४. तुकारामगाथेत प्रयत्नवादी, उदारमतवादी व समतावादी विचार व अभ्यासूवृत्तीचे महत्त्व प्रतिपादन करणारे अभंग आहेत. त्यातील दोन ह्या विवेचनाच्या संदर्भात उद्बोधक आहेत: १. असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे. २. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा.

५. दलित साहित्याचा अभ्यास केल्यामुळे समाजातील उपेक्षित स्तरांमधील व्यक्तींचे उद्ध्वस्त जीवन व त्यांचे अंतरंग ह्यांची प्रत्येक मराठी बांधवाला जाणीव होईल व त्यांच्या प्रश्नांसंबंधी मूलभूत मानवी हक्क समाजातील सर्वांना देणे हे ह्या दृष्टिकोनातून संवेदनशीलता जागृत होईल.

६. 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक रंगमंचावर पाहण्यासारखे तर आहेच पण मनोमन वाचन करण्याचे आहे. त्यातील प्रमुख व्यक्तित्वांकडून खूपसे शिकण्यासारखे. काकाजींसारख्या जंगलात व्यावसायिक जीवन जगलेल्या माणसाची रसिकता व प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधण्याची वृत्ती, सतीशचा खिलाडूपणा, उषाच्या हट्टी स्वभावाला तिच्या सतीशवरील पुन्हा जागृत झालेल्या प्रेमाने पडलेले तडे, आचार्यांची विषण्ण आध्यात्मिकता आणि गीताच्या कोवळ्या मनाची ओढाताण ह्यांचे हृद्य दर्शन पुलंनी ह्या नाटकात केले आहे.

**सारांश**

मूलभूत मूल्ये व मानवी हक्क, सकारात्मक वृत्ती, अभ्यासूवृत्ती, वस्तुनिष्ठ विश्लेषणावर आधारित निर्णय घेण्याची क्षमता व मानसिकता, समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्थान, हक्क व कर्तव्य ह्यांची जाणीव व ज्ञान रुजवण्यासाठी निवडक संस्कृत व मराठी अलोसाचे शिक्षण प्रत्येक मराठी बांधवाला विद्यार्थिदशेत देणे महत्त्वाचे आहे. केवळ साहित्याची आवड असलेल्या मराठी भाषिकामध्ये नव्हे तर प्रत्येक मराठी बांधवामध्ये (व महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये) अशी मानसिकता रुजवणे आवश्यक आहे असे माझे प्रांजळ मत आहे. माणसातील माणुसकी जागृत होणे व जिवंत राहणे अलोसाच्या अभ्यासाने साधू शकेल. अलोसाचे महत्त्व व आवश्यकता जाणाल्यावर अभ्यासक्रमाची आखणी, शिक्षकांची निवड व त्यांचे प्रशिक्षण, आर्थिक प्रयोजन इत्यादी व्यावहारिक तपशीलाकडे लक्ष द्यावे लागेल. ह्या सर्व गोष्टी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांमधील प्रतिष्ठित व्यक्तींनी व शिक्षण तज्ज्ञांनी समन्वयाने एकत्र येऊन साधता येतील असा मला विश्वास वाटतो. संस्कृत व मराठी अलोसाचा अभ्यासक्रम सुहास गो. तपस्वी ह्यांच्या समाजसुधारणेकरता आयोजित करण्यात येत असलेल्या चळवळीचा एक भाग ठरू शकेल व वैचारिक-मानसिक परिपक्वता व व्यक्तिविकास साधण्यासाठी उपयुक्त ठरेल.

अमेरिकेतील ग्रेट बुक फाउंडेशनतर्फे (महान ग्रंथ प्रतिष्ठान) अमेरिकेच्या लहानमोठ्या गावांमध्ये व शहरांमध्ये महान ग्रंथवाचन मंडळे (ग्रेट बुक क्लब) स्थापित करण्यात आली आहेत. ह्या मंडळांच्या मासिक किंवा द्विमासिक सभांमध्ये त्या त्या सभेकरता निवडलेल्या महान ग्रंथाविषयी मंडळाचे वाचक सभासद एकत्र येऊन चर्चा करतात. सभेला जाण्यापूर्वी ग्रंथ वाचावा लागतो. महान ग्रंथांची यादी प्रतिष्ठान पुरवते. सर्व ग्रथं निधर्मी क्षेत्रांमधील असतात. प्रत्येक वाचकाला त्या त्या ग्रंथासंबंधी स्वत:चे विचार मोकळेपणाने मांडतात येतात. अशा पद्धतीची मराठी महान ग्रंथ वाचनमंडळे महाराष्ट्रातील गावागावातून प्रस्थापित करता येतील. न्यू जर्सीमधील मराठी अमेरिकन मंडळींनी धार्मिक मराठी महान ग्रंथांच्या वाचनाकरता वाचनमंडळ प्रस्थापित केले आहे. निधर्मी मराठी महान ग्रंथमंडळ प्रस्थापित करण्याची आवश्यकता आहे.

---

**– डॉ. विजय वि. जोशी**
वेस्ट विंडसर, न्यू जर्सी, यु.एस.ए.
email: vajsn@hotmail.com

# मराठी परंपरा, व्याकरण आणी लेखन

(वेलांट्या 'ी' अशा, अुकार ' ु'असे आणी स्वर-अक्षरे 'अ, आ, अी, अीं, अु, अू, अे, अै, अॅ, आॅ, ओ, औ' अशी आहेत.)

'परंपरा' म्हणजे आजवर घडत आलेल्या गोष्टी. परंपरेला भुतकाळ असतो. 'परंपरा' शब्दातील भुतकाळाचा वीचार करताना सर्वसाधारणपणे 'वर्षे' आणि 'पीढ्या' या दोन फुटपट्ट्या आपण वापरतो. 'आमच्या काळी असे होते', असे 'आअी-वडील' सांगतात. त्यांच्या सांगण्यात आणि 'आजी-आजोबा' जे सांगतात त्यात फरक आढळतो. म्हणजे 'अेका पीढीवर घडणारे संस्कार' असा 'परंपरा' शब्दाचा अेक अर्थ होतो. तीन पीढ्यांचा कालावधी १०० वर्षे मानता येतो. कारण लग्नाचे वय ३० वर्षे धरले तर आअी-वडीलांचे अंदाजे वय ६० वर्षे आणी आजोबांचे ९० वर्षे योग्य मानायला हरकत नसते. म्हणजे वर्तमानकाळात तीन 'पीढ्यांच्या परंपरा' वावरतात! तीन 'पीढ्यांच्या परंपरा' अेकमेकांशी अेकाच सामान्य 'भाषेतुन' संवाद साधतात, असे खात्रीपुर्वक सांगता येते.

'परंपरेचा' दुसरा अर्थ 'अीतीहास' असा आहे. भाषेचा अीतीहास लीखीत पुराव्यावर वीसंबुन असतो. कारण 'लीखीत-पुरावे' ही अेक अैतीहासीक वस्तु ठरते. मराठीत लीहीलेला सर्वात जुना अुपलब्ध कागद १३८९ सालचा आहे. याचा 'पुरावा', डॉ. मधुकर रामचंद्र कुलकर्णी लीखीत 'भारतीय अीतीहास संकलन समीती, पुणे' प्रकाशीत, पुस्तकात आढळतो. यात जर 'नव्या' माहीतीची भर पडली तर ती त्या आधीच्या 'जुन्या' काळातील असावी लागते! 'पीढीच्या परंपरेचा', वीचार करता 'अुपलब्ध कागदा' आधी कमीतकमी १०० वर्षे तशाच प्रकारची 'भाषा' जीवंत होती असे म्हणता येते. म्हणजे १३०० सालापासुन आजपर्यंत हा मराठीच्या अुपलब्ध 'कागदी अीतीहासाचा' कालावधी ठरतो.

१३०० ते २००० ह्या सातशे वर्षांतील मराठी-भाषा' अीतीहास म्हणजे अुपलब्ध 'मराठी परंपरा' होय. आजच्या मराठी भाषेत 'अहीराणी, कुडाळी, कोकणी, कोल्हापुरी, खानदेशी, गोमांतकीय, पुणेरी, मालवणी, वऱ्हाडी, ... वगैरे बोली आहेत. या सर्व बोली भीन्न असल्या तरी त्या मराठी ठरतात. म्हणजे यात जो भीन्नपणा आहे तो त्या त्या बोलीचा वेगळा 'ढंग, बाज, लकब, स्टाअील, थाट... वगैरे' ठरते आणी या सर्व बोलीत जे सर्वसामान्य आहे त्याला 'मराठी' म्हणावे लागते. अीतीहासाला अुपलब्ध असलेला 'सर्वात जुना मराठी कागद' कोणत्या 'मराठी बोलीतला' आहे?, हेही कळु शकते. त्यासाठी 'तो कागद कोणत्या भौगोलीक परीसरात आढळला' यापेक्षा 'तो मराठी ठरतो का?' आणी त्यातल्या 'शब्दांचा ढंग, बाज, लकब, स्टाअील, थाट' कोणता आहे?, हे बघावे लागते.

प्रत्येक भाषेतील लीखीतपणात कीती बदल होअु शकतो हे त्या त्या भाषेच्या अुपजत गुणांवर अवलंबुन असते. संस्कृत भाषा 'मौखीक आणि लीखीत शब्दांना बदलु न देणाऱ्या' नीयमांवर बेतलेली आहे. त्यामुळे अडीच हजार वर्षापुर्वीच्या 'वेदकालीन संस्कृतचा' अभ्यास करण्याचा प्रयत्न 'आजच्या संस्कृत-भाषेतुन' ही करता येतो. पण मराठीत मात्र, रामदासांच्या 'मनाच्या श्लोकातील' आणी आत्ता आत्ताच्या पु.लं.च्या लेखनातील, बरेच शब्द 'नव्या पीढीला' अबोध वाटताता! 'बदलप्राप्तता' ह्या गुणधर्मात मराठी आणी संस्कृत यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. मग तरीही आपण अीतीहासाला सापडलेला १३८९ सालातील कागद 'मराठी' आहे हे कशावरुन ठरवतो? याचे सोपे, साधे आणी सुटसुटीत अुत्तर आहे 'मोडी लीपी'. 'मोडी लीपी' केवळ मराठी भाषाच वापरते. मोडीत असलेली चीत्र-चीन्हे मराठी भाषेच्या 'व्यंजन-स्वर-अक्षर-शब्दां'ना सुयोग्यता देतात. मराठी भाषेबाबत अीतीहासाला अुपलब्ध असलेल्या १३०० ते १९५० सालापर्यंतचा कालावधी मोडी-लीपीच्या 'नीश्चीत-परंपरेचा' आहे. अीतीहास संशोधक 'मोडीचा' अीतीहास दोन हजार वर्षापुर्वीचा असल्याचे सांगतात. 'आजच्या मराठीचा' वीचार करण्यासाठी 'नीश्चीत-मराठी-मोडी'परंपरेच्या' साडे-सहाशे वर्षाचा वीचार करणे योग्य ठरेल.

'चीन्हे(script)', 'अक्षर(syllable)' आणी 'अुच्चार (prounciation)' असे तीन महत्त्वाचे भाग मराठी 'लीपी'त असतात. मोडी-स्वरांबाबतची 'चीन्हे, अक्षर आणी अुच्चार' याबाबत वीचार करता, 'मोडीत वेलांट्या आणी अुकार यांचे प्रत्येकी दोन प्रकार नव्हते', असे ठामपणे सांगता येते. म्हणजेच मराठीने साडे-सहाशे वर्षांच्या कालावधीत अेकच वेलांटी आणी अेकच अुकार, 'चीन्हे, अक्षर आणी अुच्चार' यातुन वापरली.

१९५० सालानंतर मोडी-लीपी 'मोडीत नीघाली' कारण अींग्रजांच्या प्रींटीग टेक्नॉलॉजीचा वापर करण्यासाठी मराठीने 'देवनागरी-चीन्हे' स्वीकारली. अेकाच पीढीत संपुर्ण बदलणारी मराठी ही जगातील अेकमेव भाषा ठरते. मराठीची 'मोडी-परंपरा' साडे-सहाशे वर्षांची आणी 'देवनागरी-परंपरा' साठ वर्षांची आहे. अंदाजे १९५५ ते १९८५ या 'मराठी-कागदी-पीढीने' देवनागरी चीन्हातुंन अगणीत कागद 'मराठी' केले पण स्वत:ला 'शुद्ध-अशुद्ध' नीयमांची 'लागण, रोग, व्यथा, बाधा' जडवुन घेतली. मोडी-लीपीत सर्वच 'शुद्ध' होते! देवनागरीतल्या केवळ 'दोन वेलांट्या' आणी 'दोन अुकारांमुळे' मराठी व्याकरण व लेखनाला 'शुद्ध-अशुद्ध'पणाची वाळवी लागली! 'मोडी-परंपरा' आणी 'देवनागरी-परंपरा' यातील खरी 'मराठी' कोणती? 'मराठी'ने देवनागरी चीन्हे (script) घेतली तरी तीला नीखळ (original) मराठीतील अक्षर (syllable) आणी अुच्चार (pronunciation)' तसेच कायम राखता येतात. आता देवनागरीत राहुनही मराठीला 'खरी-मराठी-परंपरा' जपता येते. त्यासाठी मराठीने 'मराठमोळी देवनागरी' स्वीकारणे गरजेचे आहे. आपला,


**– शुभानन गांगल**

टेलीफोन : ९१-२२-२६२०१४७३

मोबाअील : ९८३३१०२७२७

अीमेल : gangals1234@gmail.com, gangals123@yahoo.com,

# ‘वारस होऊ अभिमन्यूचे!’

## पुस्तक प्रकाशन सोहळा

‘ग्रंथाली’ने प्रकाशित केलेल्या अनुराधा गोरे लिखित ‘वारस होऊ अभिमन्यूचे!’ या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. १० मे २००९ रोजी लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले येथील वीर सावरकर पटांगणामध्ये ‘शहीद कृतज्ञतादिनानिमित्त’ झालेल्या या पुस्तक प्रकाशन समारंभास प्रमुख अतिथी कर्नल बालाजी, मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ.स्नेहलता देशमुख, प्रसिद्ध कवी हिरालाल यादव उपस्थित होते. शहीद जवानांच्या कुटुंबीयांची उपस्थिती विशेष लक्षणीय आणि भावपूर्ण होती. त्यात कुणी वीरमाता, कुणी वीरपत्नी!

कार्यक्रमाची सुरुवात अनघा पंडितराव यांच्या ‘जरा याद करो कुर्बानी’ या भावपूर्ण गीताने झाली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शहीद दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांना मदत करणाऱ्यासाठी संस्थेतर्फे कार्यरत असणाऱ्या विविध योजनांबाबत माहिती देण्यात आली. शहीद निधीच्या योजनांबाबत प्रतिसाद देण्यासाठी उपस्थित श्रोत्यांना आवाहन करण्यात आले. तसेच त्याचदिवशी संस्थेच्या सभागृहात भरवलेल्या राहुल येल्लापूरकर यांच्या संकल्पनेतील नाविक दल, वायुदल आणि लष्काराविषयीच्या अनोख्या आणि दुर्मिळ छायाचित्रप्रदर्शनाची माहिती देण्यात आली. हा उपक्रम अतिशय आगळावेगळा, अभ्यासपूर्ण आणि कौतुकास्पद होता.

‘वारस होऊ अभिमन्यूचे!’ या पुस्तकाचे प्रकाशन कर्नल बालाजी यांच्या हस्ते झाले. मनोगत व्यक्त करताना लेखिका अनुराधा गोरे म्हणाल्या, “ आपल्या सुरक्षिततेसाठी सीमेवर अष्टौप्रहर सज्ज असणारा प्रत्येक जवान हा आपल्या कुटुंबातील सदस्य आहे. सर्वस्वाचा त्याग करून, डोळ्यांत तेल घालून सीमेवर सैनिक तैनात आहेत म्हणूनच आपण इथे सुरक्षित आहोत.”

त्या पुढे म्हणाल्या, “या पुस्तकातील कथा या केवळ शौर्यवीर जवानांच्या जीवनरेषा नसून देशासाठी आणि पर्यायाने आपल्या सुरक्षिततेसाठी, आपल्यासाठी तारुण्याचा होम करणाऱ्या धैर्यधर अभिमन्यूंच्या या कथा आहेत. त्यांच्याविषयी आपल्याला आदर अन् अभिमान असतोच पण त्यांच्या वीरमरणावर उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेला आदर-अभिमान तात्कालिक ठरतो. हे सामाजिक सत्य विचारप्रवृत्त करणारे आहे. सैनिकांबाबत असणाऱ्या सामाजिक व वैचारिक उदासीनतेला हे पुस्तक आव्हान आहे.”

सामाजिक उदासीनतेविषयी खंत व्यक्त करताना त्या म्हणाल्या, ‘शौर्यवीरांच्या वीरगतीच्या घटना प्रसारमाध्यमांकरता BREAKING NEWS असतात. आपणही अधिक उत्सुकतेने त्या पाहतो. पण तसे न होता त्या विशेष दखलपात्र, कौतुकास्पद, अभिमानास्पद अन् कृतज्ञतापूर्वक असाव्यात. असे म्हणतात की स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाज जागृत नव्हता. निद्रिस्त होता. पण आज काय आहे? आजचा भारतीय समाज जागृत नाही. निद्रीस्त तर मुळीच नाही. अगदी बेशुद्ध आहे. झिंगलेला आहे, दुभंगलेला आहे. दूरदर्शनवरील क्रिकेटच्या सामन्यात गुंतलेला आहे किंवा भारी पगाराच्या नोकरीसाठी धडपडत आहे. मी आणि माझं कुटुंब कसं सुखी होईल? या आत्मस्वार्थाच्या चौकटीतील विचारापलीकडे असणाऱ्या सामाजिक बांधिलकीचे, भावनिकतेचे अन कृतज्ञतेचे त्याला भान नाही. सैनिकांना सहानुभूतीची अपेक्षा नाही, आर्थिक मदतीची तर नाहीच. त्यांना गरज आहे त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून ‘आम्ही तुमच्यासोबत आहोत’ याची जाणीव करून देण्याची! लष्करात जाण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देण्यात यावे हा या पुस्तकाचा हेतू आहे. शहीद जवानांच्या कुटुंबीयांचा प्रश्न हा चिंतनशील आहे. त्याबाबत आपण सामाजिक जाणिवेने सहकार्य करावे असे मी सांगू इच्छिते”

त्यानंतर शहीद जवानांच्या कुटुंबीयांना लेखिकेच्या हस्ते पुस्तकाची प्रत प्रदान केली.

डॉ.स्नेहलता देशमुख आपल्या भाषणात म्हणाल्या,‘वारस होऊ अभिमन्यूचे!’ या पुस्तकातील कृतज्ञतापूर्व सखोल माहिती विचारप्रवृत्त करणारी आहे. सैनिकांविषयी आदरभाव आणि कर्तव्यभाव यांची जाणीव जनसामान्यांना होण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. हा उपक्रम स्तुत्य आहे. अशा प्रकारच्या माहितीचा उपयोग दृक्-श्राव्य माध्यमाद्वारे जनजागृतीसाठी व्हावा त्यामुळे लेखकाला काय सांगायचे आहे ते अनेकांपर्यंत पोचेल आणि लेखकाचा हेतू सफल होईल.”

प्रमुख अतिथी कर्नल बालाजी आपल्या भाषणात म्हणाले, “मी स्वतः लष्करात होतो त्यामुळे एका सैनिकाच्या व्यथा काय असतात त्या मी जाणतो. जवानांच्या वीरमरणानंतर त्यांच्या कुटंबीयांना जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष एक आव्हान असते. मी स्वतः आता एका अशा संस्थेत काम करतो जी शहीदांच्या कुटुंबीयांना मदत करते.” त्यांनी लष्करातील स्वानुभव कथन केले. त्यांच्या भाषणातून एका शिस्तप्रिय लष्करी अधिकाऱ्याचे व्यक्तिमत्त्व समोर आले.

प्रसिद्ध हिंदी कवी हिरालाल यादव यांची

कार्यक्रमातील उपस्थिती लक्षणीय होती. त्यांनी लष्कराशी संबंधित अनुभव कथन केले. सीमेवरील जवानांना भेटण्यासाठी सायकलने प्रवास करण्याची त्यांची कल्पना कौतुकास्पद होती. त्यांनी आपल्या काव्याने शहीदांना काव्यांजली अर्पण केली. त्यांच्या काव्याने रसिकश्रोते भारावून गेले. वास्तववाद, प्रखर सत्य, भारदस्त लेखणीतून उमटलेली हिरालाल यांची कविता मन विषण्ण करून थेट काळजाला भिडली. सामाजिक भावनेचे सर्व संदर्भ उलगडू पाहणारी हिरालाल यादव यांची कविता मनातील सूक्ष्म तरल भावस्पंदनांची अभिव्यक्ती करत होती.

याप्रसंगी शहीद जवान लेफ्टनंट कर्नल मनीष कदम यांचे वडील शशिकांत कदम यांनी मनोगत व्यक्त केले. मनीष कदम यांनी कर्नल म्हणून कार्यरत असताना जम्मू काश्मीर येथे तणावपूर्ण परिस्थितीत मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी कसे प्रयत्न केले आणि तेथील प्रसारमाध्यमांनी आणि मुस्लिम पत्रकारांनी त्याची घेतलेली दखल याचे वर्णन त्यांनी केले. मनीष कदम यांच्या स्मृतींना उजाळा देताना श्रोतृवृंद भारावून गेला.

कार्यक्रमाची सांगता अनघा पंडितराव यांनी वंदे मातरम्! या गीताने केली.

कार्यक्रमाचे समायोचित सूत्रसंचालन लेखिका अनुराधा गोरे यांच्या एका विद्यार्थीनीने केले.

शहीद जवानांच्या कुटुंबीयांना एकत्र आणण्याचा उपक्रम स्तुत्य होता. कार्यक्रमातील विषय आणि आशय सामाजिक विचार करण्यास प्रवृत्त करणारा होता. संपूर्ण कार्यक्रमात एक वेगळाच उत्साह होता.

का कोण जाणे पण कार्यक्रमाच्या शेवटी एक वेगळीच उमेद निर्माण झाली. सैनिकांसाठी काहीतरी करावं, कुणाला तरी या साऱ्या गोष्टी सांगाव्यात असं अगदी ठामपणे ठरवलं आणि मगच सभागृहाच्या बाहेर पडलो.

विचारचक्र चालू होतं आणि अजूनही चालू आहे. आज मी विद्यार्थी आहे पण भविष्यात मी नक्कीच सैनिकांसाठी काहीतरी करीन ही खात्री नाही, विश्वास आहे.


**– उन्मेश शंकर झगडे**
इयत्ता १० वी
अरविंद गंडभीर हायस्कूल
गुंफा रोड, जोगेश्वरी पूर्व मुंबई ६०
संपर्क : ९९६७४३३१४९



ग्रंथाली




# वारस होऊ अभिमन्यूचे

## अनुराधा गोरे

देशासाठी तारुण्याचा होम करणाऱ्या अभिमन्यूंच्या या कथा. त्या केवळ 'युद्धाच्या रम्य कथा' नाहीत. त्यांपैकी एकाच्या वीरमातेनं मांडलेला, त्यांच्या धैर्याचा आणि त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा हा पट आहे. लष्करी गणवेश अंगावर चढवण्याचा ध्यास आणि बलिदानाची आस ठेवून हे वीर सैन्यात दाखल होतात, पण त्यांच्या वीरमरणावर उत्स्फूर्त आणि मनोभावे असला तरी व्यक्त झालेला आदर–अभिमान तात्कालिक ठरतो हे सामाजिक सत्य विचारप्रवृत्त करणारं आहे. ज्यांच्या जिवावर आपण सुरक्षित जगतो त्यांच्याबद्दलच्या उदासीनतेला यात आव्हान आहे, तसंच नागरिक म्हणून आपल्या आणि देशाच्या रक्षणाचा विचार आपणही करायला हवा हे आवाहन त्यात आहे.

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये
घरपोच २०० रुपये

# ‘नवाक्षर दर्शन’

## विनायक गोखले

नियतकालिके हा समकालीन साहित्याचा आणि त्यात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यप्रवाहाचा आरसा असतो.

मराठी भाषेत गेली शंभर वर्षे विविध प्रकारची नियतकालिके प्रसिद्ध होत आहेत. ज्ञान आणि मनोरंजनाबरोबर सामाजिक बदलाची जाणीव निर्माण करणारे साहित्य नियतकालिकातून प्रसिद्ध होत असे. संतति-नियमनासारख्या विषयावर ‘समाजस्वास्थ्य’ हे मासिक र.धो.कर्वांनी प्रसिद्ध केले. साठच्या दशकात सामाजिक व सांस्कृतिक बदलाची जाणीव समाजात निर्माण होऊ लागली.

विशिष्ट वर्गाची मक्तेदारी न मानता विविध थरांतील लेखक लिहू लागले. त्यावेळी जी नियमतकालिके प्रसिद्ध होत त्यांचा वाचकवर्ग ठरलेला असे. व्यवसायाच्या दृष्टीने संपादक, मालक कोणतेही नवीन स्वरूपाचे लिखाण प्रसिद्ध करायला तयार नसत.

यातूनच आपणच आपले लिखाण प्रसिद्ध करण्यासाठी स्वतःचे नियतकालिक सुरू करावे या उद्देशाने महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली. त्यांना लघुनियतकालिके म्हणणेच योग्य ठरेल. कारण त्यांचा आकार पोस्टकार्ड, आंतर्देशीय पत्र, स्टाइल मजकूर अशा स्वरुपात व अतिशय कमी प्रमाणात प्रसिद्ध होत असे.

गेल्या पन्नास वर्षांतील या लघुनियत-कालिकांच्या चळवळीचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारा नवाक्षर दर्शनचा विशेषांक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. वसंत पाटणकर व हरिश्चंद्र थोरात यांचे अभ्यासपूर्व समीक्षा लेख, डॉ.रफीक सूरज यांचा ‘साठोत्तर लघु-नियतकालिकाची चळवळ.’ तसेच ‘अनियतकालिकामधील कविता’ हा प्रवीण बांदेकर यांचा लेख वाचनीय आहे.

पूर्वीच्या नियतकालिकां विषयी व आज प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांविषयी अनेक लेखकांनी संपादकांनी आपली मार्मिक मते नोंदवली आहेत. मर्ढेकरांची कविता येथील समाजाने सहजासहजी स्वीकारली असे झाले नाही. त्यांना अनेक आरोपांना तोंड द्यावे लागले. तरीही त्यांचे लेखन प्रस्थापित नियतकालिकांतून प्रसिद्ध होत. काही लेखक तर सत्यकथेतून लिहीत होते त्याच वेळेस लघुनियतकालिकातून ही लिहीत होते.

या नियतकालिकांतील लिखाण हे एकाच गटातील किंवा एकाच विभागातील साहित्यिकांचे असते असा आरोप होत असे. त्यामुळे कंपूशाही निर्माण होते. चांगल्या लिखाणाबरोबरच टाकाऊ लिखाण प्रसिद्ध करणे असे प्रकार होत असत. एखाद्या नवीन लेखकास या व्यवस्थेत प्रस्थापित करण्यासाठी हे प्रयत्न होत असत. ही नियतकालिके फार काळ टिकाव धरू शकली नाहीत याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन विचार किती काळ देणार? तसेच यातील काही लेखक- कवी पुढे प्रस्थापित झाले त्यामुळे त्यांना अशी नियतकालिके चालविण्याची गरज भासली नाही. या नियतकालिकांना वर्गणीदारही फारसे मिळाले नाही त्यामुळे संपादक वा त्यांचे मित्र यांच्या खिशातूनच पैसे खर्च होत असत.

लघुनियतकालिकातून प्रामुख्याने कविता प्रसिद्ध होत असत. या अंकात अशोक शहाणे, दिलिप चित्रे, अरुण कोलटकर अशा त्या काळातील कवींच्या प्रातिनिधिक कविता प्रसिद्ध केल्या आहेत. तसेच, आजचे संतोष पवार, वीरधवल परब, गणेश वसईकर या कविंच्या कविता प्रसिद्ध केल्या आहेत. यातील एक मार्मिक निरीक्षण असे आहे की या नियतकालिकातून भावकवितेस विशेष स्थान राहिलेले नाही. तुलसी परब यांची १९६८ मधील ‘शेवटच्या रात्रीची कविता’ उत्कृष्ट भावकवितेचे उदाहरण आहे ती अंकात प्रसिद्ध केली आहे. अशा नियतकालिकांचे भवितव्य काय? आज वाङ्मयीन चळवळीपेक्षा सामाजिक राजकीय चळवळीत तरुण वर्ग सामील झाला आहे. आज तालुका पातळीवर देखील नियतकालिकातून साहित्य सहज प्रसिद्ध होते. त्यासाठी व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारण्याची गरज भासत नाही. संगणकाच्या साहाय्याने देशाच्या सीमाही सहज पार करता येतात. तरीही काही अशी नियतकालिके प्रसिद्ध होतात. संपादकाचा उत्साह संपला की बंद पडतात. ‘अभिधानंतर’ बंद झाले. ‘आजचा सुधारक’ वर्गणीदारांच्या पैशात मासिक चालवता येत नाही असे सांगत आहेत. ‘अंतर्नाद’चे काय करायचे यावर पुण्यात नुकतीच बैठक झाली.

सत्यकथेने आपल्या पोलादी चौकटीत बसतील असे नवे विषय, नवे लेखक मराठी साहित्याला दिले, तसे प्रयत्न दीर्घकाल कोणी केला आहे असे वाटत नाही.

खरे पाहता, एका पुस्तकाचा विषय असलेले साहित्य एका शंभर पानी अंकात प्रसिद्ध होणे. शक्य नाही. त्यामुळेच अरुण कोलटकरांची अपूर्ण मुलाखत वाचावी लागते तसेच आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनियतकालिकांची सूची या अंकास असती तर नवीन अभ्यासकांना याचा नक्की उपयोग झाला असता. साहित्यरसिकांनी आर्वजून वाचावा असा हा अंक आहे. नवाक्षर दर्शन, बी-४, विठ्ठलकृपा अपार्टमेंट, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५१०

---

**- विनायक गोखले**
२०१, लक्ष्मी पॅलेस, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा ठाणे (प) ४०० ६०२

# आपण नाही तर कोण आणि आता नाही तर केव्हा? – डॉ. मुकुंद घारे

न्यूटनने जडत्वाचा सिद्धांत मांडला. त्यास तो मांडावासा वाटला, कारण प्रचलित विचारसरणी सोडून त्याने विचार केला. जे उमजले ते सर्वांना समजावे व त्याआधारे बदल घडून येण्याची अपेक्षा, हीच त्याच्या कार्यामागची प्रेरणा होती.

'दहा वर्षं तरी देश मिलिटरीच्या ताब्यात देणं गरजेचं आहे, भारताला एका हिटलरची जरुरी आहे!' वा 'ब्रिटिशांचं राज्य फार बरं होतं.' असे विविध विचार लोकांकडून वेळोवेळी ऐकावयास मिळतात.

जीवनावश्यक वस्तू महाग, तर चैनीच्या वस्तूंची उपलब्धता शून्य टक्के व्याजाने व सुलभ हप्त्याने!

प्रचंड धरणसाठे आणि हजारो रुपये खर्चूनही सत्तर टक्के जमीन पर्जन्याधारित, सिंचनावरील खर्च वाढला, पण पिण्याच्या पाण्याची टंचाई सातत्याने आणि आता तर त्यात शहरांचाही समावेश.

गरिबी व श्रीमंती ह्यांमधील दरी नाहीशी होऊन दोन वेगवेगळे खंड निर्माण होत आहेत! खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणा-पायी आदिवासी, भटके, दरिद्री हे आरएनआय, 'निवासी अभारतीय' झाले आहेत.

नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास साधत आज एकीकडे विकास व महासत्तेच्या घोषणा होत आहेत, तर प्रतिदिनी रुपये वीसच्या आधाराने जगणाऱ्यांची, 'बीपीएल' खाली असणाऱ्यांची, लोकसंख्या वाढत आहे. अन्नोत्पादनात वाढ साधूनही दरडोई अन्नाची उपलब्धता घटत आहे.

वांशिक व धार्मिक तंटेबखेडे आणि प्रांताप्रांतातील, भाषाभाषांमधील वाद वाढताहेत. विकासप्रकल्पांमुळे निर्माण होणारे वाढते ताण-तणाव, सातत्याने वाढणारी निर्वासितांची आणि विस्थापितांची संख्या, त्यातून निर्माण झालेल्या हिंसाचार व मानवी हक्कांवर होणारी आक्रमणे ठिकठिकाणी अनुभवास येत असतात.

एका बाजूला अद्ययावत विमानतळ, तर दुसऱ्या बाजूस गलिच्छ बसस्थानक, परदेशी विद्यापीठांचा सुळसुळाट तर प्राथमिक शिक्षणाची अवहेलना. औषोधपचाराच्या मानाने मरण खूप स्वस्त!

भ्रष्ट मतदार हा कधीच निकोप शासन निवडू शकत नाही, म्हणून मतदारास भ्रष्ट करणारे राजकीय पक्ष, राजकारणाचे होणारे गुन्हेगारीकरण.

ह्या व अशा साऱ्या प्रकारांमुळे विचारी, सभ्य व सामान्य नागरिक सुरुवातीला व्यक्त झालेल्या उपाययोजना सुचवतो; कारण तो स्वतःला अगतिक समजत असला तरी त्याच्या जाणिवा जागृत असतात. एकमेकाबरोबर विचारविनिमय करू लागला तर तोच परिस्थिती बदलू शकेल. समाजात वैचारिक बदल घडवून आणायचा की हिटलर निर्माण करायचा? गरजेच्या बदलाचे सुतोवाच आपल्यासारखे जाणकार नाही करणार तर अन्य कोण करणार? आणि केव्हा? एखादा हुकुमशहा निर्माण झाल्यावर? शिक्षणसंस्था बंद पडल्यावर? स्वार्थ पराकोटीला पोचून द्रव्यलालसा व सत्तालालसेवर आधारित शासनव्यवस्था निर्माण झाल्यावर?

म्हणून, भानावर येउ या! आपण नाही तर कोण व आता नाही तर केव्हा?

– डॉ. मुकुंद घारे
पुणे
दूरध्वनी : (०२०) २५४५३२९२

## 'जनसंवाद'ची भूमिका

आजच्या भारतात धर्मनिरपेक्षता अत्यंत महत्त्वाची आहे, तीच गोष्ट वंचितांच्या विकासाची आणि संविधानात व्यक्त झालेल्या नागरिकांच्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची. एवढं मात्र खरं, की विभाजनातून मतपेढ्या उभारण्यासाठी राजकीय शक्ती निवडणुकांच्या राजकारणातून निर्माण होणाऱ्या भोवऱ्यात अडकली आहे. धनवान व राजकारणी ह्यांचे संगनमत पूर्वापार चालत आले होते, त्या साट्यांलोट्यात आता गुन्हेगारी क्षेत्राचीसुद्धा भर पडली आहे. परिणामी, सर्व राजकीय पक्षांतील सत्शक्ती एकाकी पडलेली दिसते.

अशातच, झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालातून एक निष्कर्ष काढता येईल की आजकाल धर्म, इझम(विचारसरणी), वगैरे तात्त्विक गोष्टींचं आकर्षण सामान्य मतदाराला फारसं उद्युक्त करत नाही; ती नशा उतरते आहे. 'माझं भलं कशात आहे, ते कोण साधू शकेल?' ह्या विचारांकडे मतदार वळतो आहे. लोकांना विकासाचं महत्त्व पटू लागलं आहे. हीच वेळ आहे देशात एखादी धर्म व विचारसरणी यांच्या निरपेक्ष चळवळ उभी करण्याची!

उद्बोधनातून ('एनलाईटनमेंट' साधून) लोकांना विकासाभिमुख करणं, संविधानातील हक्क व नागरी जबाबदाऱ्या ह्या गोष्टींची उकल करून कायदापालनाकडे नागरिकांना प्रवृत्त करणं महत्त्वाचं आहे. लोकशाही व नागरिकत्वाच्या मूल्यांचं शिक्षण देऊन त्या मूल्यांच्या पालनातून साधल्या जाणाऱ्या सक्षम समाजात प्रत्येकाचं जीवन कसं सुखकर होईल, हा फायदा लोकांना समजावून सांगणं आवश्यक आहे. सुसंस्कृत वर्तणुकीला समाजात मानाचं स्थान लाभलं, तर प्रत्येक जण तसं वागण्यासाठी आकृष्ट होईल. म्हणून, तसं वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणं समाजधुरीणांचं कर्तव्य आहे. ह्या व अशा उद्दिष्टांनी एखादी चळवळ उभी राहणं

देशात नितांत गरजेचं आहे. गरजेचं असलं तरी अशा चळवळीच्या अभावानंच आमची संस्कृती, आमचं संविधान सक्षम असून निष्प्रभ ठरत आहे.

आजवर अनुभवलेल्या विविध राज्यपद्धतीत, आज तरी, लोकशाहीला पर्याय नाही. परंतु, निव्वळ वय झालं म्हणून मतदानाचा हक्क देणारी लोकशाही कुचकामाची आहे, हे आम्हा साऱ्यांच्याच लक्षात यायला लागलं आहे. जेवढ्या लवकर आम्ही समाज विकसित करू, सज्ञान करून लोकशाहीला लायक करू, तेवढं ते देशाला हितकारक ठरणार आहे.

वैयक्तिक असहायता, हतबलता दूर करण्यासाठी, विविध धर्मांच्या, विविध विचारसरणींच्या सत्शक्तीनं तात्त्विक मतभेद दूर ठेवून, एकत्र येऊन समाजविकासाला हातभर लावणं अग्रक्रमाचं आहे. असं व्यासपीठ निर्माण करण्यासाठी, २ व ३ मे २००९ रोजी तारखांना 'जनसंवाद' मेळावा पुण्यात संपन्न झाला. महाराष्ट्रातील विविध विचारसरणींच्या तीस-चाळीस विचारवंतांनी एकत्रितपणे 'जनसंवाद' ह्या नावाने चळवळ सुरू करून प्रस्तुतच्या उद्देशानं काम करण्याचं ठरवलं आहे.

उपरोक्त भावनांचा प्रसार साधावा आणि प्रचारातून, लोकसंग्रहातून चळवळीसाठी गरजेचं संख्याबळ उभं करता यावं हा चळवळीचा प्रारंभीचा उद्देश आहे. विविध माध्यमांतून व अनेक प्रकारे जनतेशी संवाद साधून समाज वैचारिकदृष्ट्या घुसळून काढण्याचे चळवळीचे प्रयत्न राहतील. लोकांमध्ये स्वविकासाची आस निर्माण करणं आणि विचारमंथनातून लोकशाही व नागरिकत्वाच्या मूल्यांचं महत्त्व पटवून त्या मूल्यांची साऱ्या समाजात रुजवात करणं हे 'जनसंवाद' चळवळीचं दूरगामी लक्ष्य असेल. आधुनिक काळात सुसह्य व सुखकर नागरी जीवनासाठी उपरोक्त मूल्यांच्या उद्बोधनातून सुयोग्य सामाजिक वातावरण देशात निर्माण करता येईल, ह्या विश्वासातून 'जनसंवाद' चळवळीची सुरुवात झाली आहे.

'जनसंवाद' ही एक धर्मनिरपेक्ष चळवळ आहे; कोणत्याही सामाजिक, धार्मिक वा राजकीय विचारसरणीवर ती आधारित नसून ते सर्वसमावेशक असं एक सामाजिक व्यासपीठ मानता येईल. चळवळीचं एक उपांग म्हणजे जनसंवाद; जनसंपर्कातून समाजसुधार आणि सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या समजातील व्यक्तींचं संख्यावर्धन साधणं! विकास व त्या विकासात व्यक्तिविकासाला द्यायचं प्राधान्य आणि संदर्भातील मूल्यांना समाजानं अग्रक्रमाचं मानण्यासाठी प्रयत्न, ह्या गोष्टी चळवळीच्या सोपानाच्या पहिल्या पायऱ्या मानल्या पाहिजेत.

'जनसंवाद'च्या कामाचा आढावा घेण्यासाठी 'जनसंवाद'चे सु.गो. तपस्वी, आनंद आगाशे, विद्या बाळ, असीम सरोदे, जयंत नेने, राजश्री क्षीरसागर आणि धनंजय गांगल असे सात सदस्य दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी सायंकाळी भेटणार आहेत.

---

२ मे २००९ रोजी मराठी वाङ्मय क्षेत्राचं मोठं नुकसान झालं, एका महान व्यक्तिमत्त्वाला व जाणकार प्रगल्भ वक्त्याला महाराष्ट्राला मुकावं लागलं.

राम शेवाळकरांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग, दुर्दैवानं, मला एकदाच लाभला; तो मात्र त्यांच्या घरी, नागपूरला. 'विकासाची रूपरेषा' ह्या माझ्या पुस्तकात. मी सुचवणार असणाऱ्या एका सामाजिक चळवळीबाबत प्रस्थापितांचा व जनसामान्यांचा प्रतिसाद अजमावण्याकरता मी त्यावेळी करत असलेल्या महाराष्ट्र दौऱ्यातील विदर्भ संपर्काचा तो भाग होता; ऑक्टोबर २००८ च्या सुमारा-चा. भेटीदरम्यान माझ्या प्रयत्नांना मनःपूर्वक दाद देताना शेवाळकरांनी मार्गातील अडचणीसुद्धा माझ्या निदर्शनास आणून दिल्या. त्या संदर्भातील, सार्वजनिक जीवनातील, विशेष करून 'आचार्यकुला'संबंधातील, त्यांचे सानुभवकथन माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचं होतं.

त्यांचं खाजगी वाचनालय म्हणजे ज्ञानाचं एक समृद्ध कोठार होतं. बंगल्यातील एक संपूर्ण मजला व्यापणाऱ्या त्या वाचनालयात उत्साहानं माझ्याबरोबर फिरत असतानाचा त्यांच्या चेहऱ्यावरील अभिमान स्वत: जमवलेला 'खजिना' दाखवणाऱ्या बालकाचा होता!

माझ्यासारख्या त्रयस्थ व्यक्तीबरोबर दोनेक तास चर्चा करून शेवाळकर थांबले नव्हते, मला दुपारच्या भोजनाचाही आग्रह झाला. त्यांच्यासारख्या चवीनं जेवणाऱ्या रसिकाबरोबर भोजन हासुद्धा एक आनंददायी अनुभव असतो. यजमान ह्या नात्यानं अनेकांना तो त्यांनी नेहमीच दिला. त्यांच्यासाठी खास स्वतः केलेल्या वऱ्हाडी पदार्थांसाठी त्या दिवशी त्यांनी तोंडभरून केलेलं पत्नीचं कौतुक मला बरंच काही सांगून गेलं. उतारवयातही किती समृद्ध व आनंदी वैवाहिक आयुष्य जगत होते ते!

उपरोक्त प्रसंग त्यांच्या मनमोकळ्या स्वभावाचा पैलू म्हणून माझ्या कायम लक्षात राहील.

दौऱ्यावरून परतल्यावर घरी जमलेल्या टपालात शेवाळकरांकडून आलेलं भेटकार्ड बघून तर मला आश्चर्याचा सानंद धक्का बसला. त्यांचं शेवटचं, २४ एप्रिलला लिहिलेलं पत्र मला ३१ एप्रिलला मिळालं होतं. पुण्यातील २ व ३ मे रोजी महाराष्ट्रातील सत्शक्तीच्या मी आयोजित केलेल्या मेळाव्यास प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते उपस्थित राहू शकत नाहीत, ह्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणाऱ्या त्या पत्रात त्यांनी मेळाव्यातील कार्यक्रमाला शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या.

मेळावा सुरू असताना, शेवटच्या सत्रात सामाजिक चळवळीचं नामकरण 'जनसंवाद' असं करण्याचं ठरवून आम्ही समारोपाकडे वळणार तोच कुमार सप्तर्षींच्या मोबाईलवर शेवाळकरांच्या निधनाचा दुःखद संदेश आला. उपस्थितांतील धनागरे ह्यांना दोन-चार दिवसांपूर्वीच शेवाळकर भेटले होते. तेव्हा झालेल्या हास्यविनोदाच्या आनंदी प्रसंगाचं वर्णन करून धनागरे ह्यांनी शेवाळकरांच्या अनेक गौरवास्पद आठवणी तेव्हा सांगितल्या. मला मात्र एक रुखरुख बोचते आहे; शेवाळकरांच्या मेळाव्यासाठी पाठवलेल्या शुभेच्छांची मी पोच देऊ शकणार नव्हतो, त्यांना मूक श्रद्धांजली अर्पण करण्याचाच योग माझ्या नशिबात होता.

**– सु.गो.तपस्वी**

इंटरनेटद्वारे पाठवलेला रुची मार्च २००९चा अंक मिळाला. धन्यवाद.

संजय पवार यांचे विद्रोही संमेलनातील अध्यक्षपदाचे भाषण वाचले. गेली काही वर्षे ह्या विचारधारेचे समाजामध्ये सतत प्रसारण होत आहे. त्यात भारतीय राज्यघटनेने ज्याला गुन्हा म्हटले आहे असे जातींना संबोधून विद्वेशी सरसहा आवाहन आहे. आपल्या वयोगटातील विचारी माणसे याकडे कसे बघत असतील हा विचार मनात येतो.

विद्रोहीला प्रतिवाद फारसा वाचनात येत नाही. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या मनात आलेले विचार कळवत आहे. आता ते कदाचित कालबाह्य किंवा प्रतिगामी ठरण्याच्या शक्यतेचा धोकासुद्धा लक्षात घेतला आहे.

प्रथम सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करण्यासाठी, भावनिक कल्लोळ बाजूला ठेवून निव्वळ बुद्धी व तर्काने विचार केला तर वेगवेगळी योग्य आर्थिक तत्त्वज्ञाने, त्याची अंमलबजावणी या गोष्टींबरोबरच,

१. जन्मलेल्या प्रत्येक बालकाला मातापित्यापासून दूर करून, समाजाने बालकांच्या जन्मजातीचा कसलाही संदर्भ न ठेवता शक्य तितके समान वातावरण त्यांच्या वाढीसाठी देणे व त्याला समाजोपयोगी बनवणे.

२. व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिची मालमत्ता समाजाने घ्यायची. वारसा म्हणून अपत्यांना कसल्याही प्रकारचा फायदा मिळू द्यायचा नाही, ह्याची अंमलबजावणी करता आली (?) तर वंशपरंपरेमुळे मिळणारे फायदे, त्याच्या अर्थिक सामाजिक सत्तेच्या जोरावर निर्माण करून पोसता येणारी हुजरेमंडळींची जातीय फौज यांवर व विषमतेवर आळ बसेल. आज देशभरात अनेक ठिकाणी सर्व सामाजिक गटांतील बाल-तरुण, आईबापाच्या योग्यायोग्य क्षमतेच्या जोरावर, कसलेही विशेष काम न करता धनाढ्य होऊन आर्थिक, व राजकीय व गुन्हेगारीची साम्राज्ये उपभोगत आहेत. घराणेशाही नको म्हणत समाजवादाच्या, आर्थिक न्यायाच्या गप्पा मारत आपली नवी घराणेशाही लोकांच्या जातीय द्वेषभावनेचा वापर करून सहज अमलात आणत आहेत हे विदारक सत्य आहे.

विषमता दूर करण्याच्या वर दिलेल्या दोन मार्गांविषयी कधी चर्चापण होत नाही इतके ते असंभाव्य वाटतात. त्याशिवाय पण आपल्या देशातील अनेक विक्राळ जटिल प्रश्नांमध्ये लोकसंख्येच्या झुंडींचा रेटा की ज्यामुळे बुद्धी, तर्क, सद्भावनेने निर्भिडपणे मोडकळलेल्या समाजाच्या हिताचे कार्य करणे हे विषयच संपून गेल्यासारखे दिसतात. येनकेन मार्गाने निवडणूक जिंकून स्वत:साठी सर्व प्रकारच्या उपभोगांना मार्ग उपलब्ध करायचा हेच प्राथमिक ध्येयधोरण सगळीकडे दिसते.

ऐंशी-नव्वदाच्या दशकात लालूप्रसादांचे राजकीय पटलावर आगमन होताच लोक-संख्येच्या अक्राळविक्राळ प्रश्नाला बगल देऊन विद्वेषाचे झुंडीचे राजकारण जोमाने पुढे आले आहे. खुनी, गुन्हेगार, दरोडेखोर, भ्रष्टमंडळी राजकीय व प्रशासनिक उच्चस्थानी मजेत राहून समाज- विघटन करत आहेत. याविषयी आवश्यक अशा विरोधी उपायांबाबत मात्र फक्त बोलघेवडेपणाच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच फक्त सात कोटी दलित व अस्पृश्यांच्या प्रश्नाविषयी लढे देत होते. पण आज दलितांची संख्या चौतीस कोटी झाली आहे. कदाचित त्यातील सुमारे तीन-चार कोटी दलित लोकसंख्येला बदलत्या समाजव्यवस्थेत घटनात्मक तरतुदींमुळे सुस्थितीत येता आले असले तरी ह्याच पन्नास वर्षात, आजच्या अमेरिकेच्या लोकसंख्ये-इतकी पण आर्थिक कमजोर अफाट लोकसंख्येची भर, ह्या पूर्वापार दरिद्री देशात टाकल्यानेच एकतीस कोटी दलितांचा प्रश्न तसाच बिकट राहिला आहे. ह्या विदारक सत्याची, विषारी जातीय भाषणाद्वारे प्रसार करणारे संजय पवार किंचित दखल सुद्धा घेत नाहीत हे आश्चर्य नाही का? असे करण्यातली सोय लक्षात घेतली तरीसुद्धा डॉ. बाबासाहेबांसारख्या थोर माणसाला लोकसंख्यावाढीद्वारे सत्तासंपादन अभिप्रेत असेल असे वाटत नाही.

कोकणस्थ व पेशवे ह्यांच्याविषयी काळाची सापेक्षता लक्षात घेऊनच त्यावेळच्या असलेल्या दोषपूर्ण व्यवस्थेविषयी बोलावे लागेल. भारतात इतर ठिकाणी महाराष्ट्राहून फारशी वेगळी स्थिती नव्हती. पण कर्तबगार पेशव्यांच्या अचाट कामगिरीमुळेच तोवर इतिहासात दरिद्री व नगण्य असलेल्या अशा महाराष्ट्राचे व मराठी माणसाचे इतर प्रांतांनी हेवा करावे असे भारताच्या व जगाच्या इतिहासात स्थान दिसू लागले. महाराष्ट्रातील सर्व जातींमधील अनेक कर्तबगार कुटुंबांचा उत्कर्ष झाला. भारताच्या इस्लामीकरणाला खीळ बसली. पेशवे उदयाला आले तेव्हाची स्थिती बारकाईने बघितली तर हे चित्र लक्षात येते. पेशव्यांनी काळाची पावले ओळखून धडाडीने भारताचे भवितव्य बदलले. इंग्रजांनी महाराष्ट्र जिंकल्यावरसुद्धा कालौघात येथे इतर प्रांतांच्या तुलनेने अनेक थोर नेते, कार्यकर्ते, समाजसुधारक निर्माण होऊन सामाजिक सुधारणा, शिक्षण, सर्वच पक्षांचे राजकारण, स्वातंत्र्य चळवळ आदींसाठी महात्मा गांधींच्या शब्दात कार्यकर्त्यांचे मोहोळ उठले, त्यांनी आपले जीवन सर्वस्व कार्यासाठी वाहिले. पाश्चात्य विद्येच्या अभ्यासाच्या जोडीला येथे नुकतेच स्वकीय राज्य होते ही भावना जागृत असल्याने हे सर्व झाले. या सर्व कार्याची हेटाळणी, तुच्छतेच्या भावनेने करणारे, विषारी द्वेषभावनाच ठेवून ह्या बाबींचे स्मरण का ठेवतील?

बुद्धी व तर्काने विचार केल्यास अशा सतत होत असलेल्या विषारी कल्लोळामुळे लवकरच, टार्गेट केलेल्या अत्यल्पसंख्य मानवी समूहांचे अस्तित्व धोक्यात येणार की काय असा प्रश्न पडतो.

खरे तर स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या त्याकाळच्या थोर, विवेकी, सहृदय नेत्यांनी देशाची नवी घटना तयार करून त्यात दलित समाजाची उन्नती व्हावी म्हणून त्यांना कायद्याने अनेक विशेष अधिकार, फायदे, आरक्षण दिले. त्याचा भरपूर फायदा दलितांना

मिळत आहे. चातुर्वर्ण्य, मनुस्मृती वगैरे गोष्टी कालबाह्य व बेकायदा झाल्या व संपुष्टात आल्या. खैरलांजी वा अशा इतर घटनांचा त्याच्याशी कितपत संबंध आहे? इतिहासात घडलेल्या गैरगोष्टींचा गेल्या शंभर वर्षामधल्या बहुसंख्य सामान्य साध्यासुध्या माणसांचा काहीही संबंध नाही. तुमच्या पूर्वजांनी आमच्या पूर्वजांवर अन्याय केले त्याचा सूड आता घेणारच ही प्रसिद्ध लांडगा व कोकरू गोष्टीतल्या रूपकाची भूमिका आधुनिक विज्ञान व अभूतपूर्व उपयुक्त तंत्रयुगाला धरून नाही. सामाजिक प्रश्नांना कालाचे, जागतिक स्थिती व सुधारणा यांचेपण परिमाण आहे. विज्ञान तंत्रयुगामुळे शेतीप्रधान समाजव्यवस्थेमध्ये बदल घडून औद्योगिक क्रांती झाली. जन्म-मृत्यू याच्यावर खूपसा ताबा आला. शहरीकरणाचे अचाट प्रश्न उभे राहिले. अनेक प्रकारची प्रदूषणे, कोलाहलामध्ये माणसांची स्वस्थता संपली. पण हे काहीच लक्षात न घेता विषमतेच्या स्थितीतील लोकसंख्येच्या विक्राळ रेट्यापोटीच हे सोपे आक्रस्ताळे द्वेषाचे सोपे तत्त्वज्ञान चालले आहे हे खरे.

देशात सतत घडत आलेल्या अनेक दंगलींना नेहमीच अशीच काही द्वेषपूर्ण प्रचाराची पार्श्वभूमी लाभत आली आहे. माझ्या लहानपणी आमच्या घराच्या छपरावरून पाहिलेले, गांधीवधाचे निमित्त साधून गांधी आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाशी कसलाही संबंध नसलेल्यांनी जातीय सूडभावनेने पुणे शहरभर उठवलेले भयानक आगीचे डोंब मी कधीही विसरू शकत नाही. या क्रोधभावनेचा ओघ अनेक दशके चालत आलेल्या द्वेषपूर्ण प्रसारात होता. अनेक सामान्य कुटुंबे त्यात महाराष्ट्रभर नाहक भरडून निघाली. राजसत्तेला, पोलिसांना अशा दंगली थांबवण्यात लवकर कधीच यश येत नाही. मारणारे मारत राहतात, मार खाणारे दीर्घकाल असहाय होतात हे बहुतेक दंगलींचे चित्र गेल्या पन्नास वर्षांत भारतात दिसत आले आहे. पण गठ्ठामतांच्या जातीय राजकारणात मोठ्या संख्येच्या समूहाला, इतर कोणाच्या नावाने आगपाखड करून चेतवण्याचे-भडकवण्याचे काम चालू असते. मध्यंतरी पुण्यातील भांडारकर संशोधन संस्थेवर झालेला हल्ला, एन्रॉन-गोडबोले अहवाल व धमकावण्या वगैरे प्रकारांचे मूळ तिथे आहे.

एक अत्यंत सामान्य ढोबळ विधान असे करता येते की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्यांनी कुटुंबनियोजन केले त्यांची स्थिती ते त्यावेळी कोणत्याही आर्थिक स्तरातील जाती-धर्माचे असले तरी पूर्वीपेक्षा सुधारली आहे. अर्थात याला व्यक्तिगत, रोगराई, अपघात, अडाणी, व्यसनीपणा वगैरे अपवाद काही वेगळी स्थिती आणू शकतील. पण ज्यांनी कुटुंबनियोजन न करता लोकसंख्या भरली अशांची अनेक ठिकाणी दुस्थिती आहे. धनदांडगे बनलेल्या लालूसारखे लोक विरळाच. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी तर सार्वत्रिक सर्व जातीधर्माच्या लोकांमध्ये, हालअपेष्टा, उदंड, दारिद्र्य होते. हे गेल्या साडेतीनशे वर्षात प्रसिद्ध झालेल्या लिखाणा, वाङ्मयावरून दिसून येईल. आपल्या शेतीप्रधान देशात स्वकीय संपन्न समाज फारच थोडा होता असे दिसते.

राजकारणी मंडळींना सत्ताभोगासाठी, गठ्ठामतांसाठी, सामान्य लोकांमध्ये आपापसामध्ये लढाया लावणारी विषारी विचारधारा पसरवावी लागते. मध्यंतरी मा. आर.आर. पाटीलसाहेबांनी प्रामाणिकपणे याची जाहीर कबुली दिली होती. विक्राळ वाढत्या लोकसंख्येचे बदलते रंग, गटागटांमध्ये लढाया लावून राजसत्ता काबीज करणे, त्यातून देशाचे रंग तयार करणे हे सगळे राजकारणी मंडळींचे काम आहे. प्रखर रॅशनॅलिस्ट विचाराचे डॉ. र.धों. कर्वे यांच्या जीवनावरील चित्रपटात दाखवलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीवरून त्यानंतर वाढत्या लोकसंख्येद्वारे सत्ता काबीज करणे अभिप्रेत नसावे असे वाटते. चीनमध्ये एक कुटुंब- एक मूल हा कुटुंबनियोजनाचा संदेश गेली तीस वर्षे कसोशीने अमलात आणून एकशेचाळीस कोटी लोकसंख्येवर ते स्थिर झाले.

नव्या काळात काही प्रमाणात नव्या नव्या संधी चरितार्थासाठी लोकांना उपलब्ध झाल्या असल्या तरी भारतातील बहुसंख्य असलेल्या सामान्य लोकसमूहांची जगण्याच्या संघर्षाची स्थिती मात्र दिवसेंदिवस गंभीर होत आहे हे विचारी माणसांना पटायला हरकत नसावी. मग राजकारणी काहीही म्हणोत.

**– विद्याधर गो. गोरे**
रो हाऊस नं. ३०, सुयोजित गार्डन,
सहदेव नगर, जुना गंगापूर रस्ता,
निर्मला कॉन्व्हेंटजवळ, नाशिक ४२२ ०१३
फोन : ०२५३ २३१६१०४

---

पंचेचाळीस टक्के मतदान याचे आश्चर्य वाटत नाही, मतदान करताना चांगल्या-वाईटाचा विचार करावा लागतो. आपल्यापुढचे पर्याय एकाला झाकून दुसऱ्याला काढावे असे आहेत. सगळ्याच पक्षांचे उमेदवार कोट्यधीश कसे? (एखाद-दुसरा अपवाद वगळता) खिडक्या अरुंद होत आहेत हे सत्य आहे व कक्षा रुंद व्हाव्यात यासाठी 'ग्रंथाली' प्रयत्नशील आहे त्याबद्दल शुभेच्छा.

डॉ.कुमार सप्तर्षींच्या विशेष लेखाने निराशा केली. या लेखात अनेक विसंगत विधाने आहेत. त्या सर्वांविषयी न लिहिता फक्त शेवटच्या दोन परिच्छेदांविषयी माझ्या प्रतिक्रिया देत आहे.

'स्पर्धा आणि आत्मकेंद्रिता या घटकांवर पाश्चिमात्य संस्कृती उभी आहे. तर भारतीय संस्कृती 'वाटून घेणे' (शेअरिंग) या तत्त्वावर अवलंबून आहे. भारतीय समाजरचना श्रेणीबद्ध उतरंडीवर व आत्यंतिक विषमतेवर उभी असूनही शेकडो वर्षे टिकून राहिली, ती तिच्या याच वैशिष्ट्यामुळे', डॉ.कुमार सप्तर्षी.

'वाटून घेणे' या तत्त्वावर जर 'आत्यंतिक विषमता' शेकडो वर्षे टिकून आहे तर इतकी वर्षे काय 'वाटून घेतले' याचा उलगडा होत नाही.

या वैशिष्ट्याला छेद जाऊ लागला आहे. ही गोष्ट वाईट की चांगली? आत्यंतिक विषमता अशीच आणखी शेकडो वर्षे टिकून राहावी व आपले 'वाटून घेण्याचे' तत्त्व अबाधित राहावे असेच आपल्याला म्हणायचे आहे ना?

**– रत्नाकर महाजन**
३१५/बी विंग, मयुरपार्क,
मालवीय रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई ४०० ०५७